क्रमांक : ८५

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक १७ सप्टेंबर, २०२० / भाद्रपद २६, १९४२ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**८५.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) सत्र शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील प्रलंबित **१००** लक्षवेधी सूचनांपैकी **३२** लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२० रोजी पत्रक-भाग-२ व्दारे तसेच **६८** प्रलंबित सूचनांच्या निवेदनापैकी **२५** सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी वितरीत करण्यात आलेली आहेत. आता **४३** प्रलंबित सूचनांच्या निवेदनापैकी **२१** सूचनांची निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. प्रलंबित **२२** निवेदनांबाबत संबंधित मंत्रालयीन विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत असून सदर निवेदने प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या प्रती वितरीत करण्यात येतील.

**विधान भवन,**
**मुंबई,**
दिनांक : १७ सप्टेंबर, २०२०

**राजेन्द्र भागवत**
सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

\\Mlsf१०१\e\२०२० THIRD SESSIoN\Lakshvedhi\Nivedan vitrit.doc

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन
## श्री. सुनिल शेळके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मावळ मतदार संघात तसेच राज्यात स्थानिक भूमीपुत्रांच्या रोजगाराचा प्रश्न एरणीवर येणे, एकटया माझ्या मावळ मतदार संघात एकूण जमीनपैकी कंटामेंट बोर्ड करता २९२.४८ हेक्टर क्षेत्र औद्योगिक वसाहतीकरीता ४३२.१३९४ हेक्टर राष्ट्रीय महामार्ग किंवा राज्य महामार्गाकरीता ४०७.१०१५ हेक्टर तळेगाव डेपोकरीता ३३५.६९ हेक्टर धरणाकरीता ५४३३.२५ अशी एकूण ६८८९.६६०९ हेक्टर इतकी मोठया प्रमाणावर जमीनीचे भूसंपादन करण्यात आलेलें असणे, आपला देश तथा राज्य हा कृषी प्रधान देश असल्याने जवळपास ७० टक्के नागरीक हे रोजगाराकरीता शेतीवर अवलंबून असणे, भूसंपादन केल्यामुळे सदर शेतकरी हे भूमीहीन होवून बेरोजगार होणे, भूसंपादन करताना शासनामार्फत देण्यात आलेला मोबदला हा भविष्यातील उपजिवीकेकरीता पुरेसा नसणे, मावळ मतदार संघात जमीन भूसंपादीत केल्यामुळे तब्बल ५३३६ शेतकरी व त्यांचे कुटुंब भूमीहीन होणे, सदर शेतकरी भूमीहीन झाल्यामुळे त्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांचा रोजगाराचा प्रश्न सतत निर्माण होत असणे, संपादीत केलेल्या जमीनीमध्ये नव नवीन कंपन्या येवून रोजगाराची निर्मीती होत असणे, परंतु स्थानिक भूमीपुत्र उपलब्ध रोजगारापासून वंचित राहणे, वेळेवेळी शासनाकडे स्थानिक भूमीपुत्रांच्या रोजगाराकरीता ठोस भूमिका घेण्याबाबतची मागणी होणे, परंतु शासनाकडून अद्याप भूमिका स्पष्ट न होणे, यामुळे याचा प्रतिकूल परिणाम स्थानिक भूमीपूत्रांवर होणे, यामुळे याचा प्रतिकुल परिणाम स्थानिक भूमीपुत्रांवर होणे, यामुळे स्थानिक युवकांमध्ये असंतोषाचे वातावरण व शासनाप्रती नाराजीची भावना निर्माण होणे, याकरीता शासनाने त्वरीत स्थानिक भूमीपूत्रांना ५० टक्के आरक्षण राज्यातील इतर युवकांना ३० टक्के आरक्षण व उर्वरीत २० टक्के इतरांना देण्याचे धोरण निश्चित करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रया ."

### मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

पुणे जिल्हयात एकूण ६७७ मोठे उद्योग असून ३२९२४६ एवढी रोजगार निर्मीती झालेली आहे. तसेच जिल्हयात एकूण ३८५७१ सुक्ष्म व लघु व मध्यम उपक्रम स्थापित असून त्यामध्ये रू. २५३९७ कोटी एवढी गुंतवणूक झालेली असून त्याव्दारे २७३७०१ एवढी रोजगार निर्मीती झालेली आहे. मावळ तालुक्यात ४४ मोठे उद्योग कार्यरत असून त्यामधील पर्यवेक्षकीय श्रेणीत ३२५२ व पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत १०९७८ रोजगार निर्मीती झालेली आहे. स्थानिक रोजगाराबाबत मोठे व विशाल उपक्रमामध्ये जानेवारी, २०२० अखेर पर्यवेक्षकीय श्रेणीत स्थनिक लोकांना रोजगाराचे प्रमाण ८४ टक्के एवढे असून पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत स्थनिक लोकांना रोजगाराचे ९८ टक्के इतके आहे. सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमध्ये जानेवारी, २०२० अखेर पर्यवेक्षकीय श्रेणीत स्थनिक लोकांना रोजगाराचे प्रमाण ९६ टक्के एवढे असून पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत स्थनिक लोकांना रोजगाराचे ९५ टक्के इतके आहे. मोठे व लघू उद्योगांमधील स्थनिक रोजगाराबाबतची टक्केवारी दिनांक १७/११/२००८ रोजीच्या शासननिर्णयामधील तरतुदीनुसार विहीत टक्केवारीची पुर्तता करीत आहे.

मावळ तालुक्यात दोन औद्योगिक सहकारी बसाहती स्थापित असून तळेगांव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. १ चे क्षेत्र ५७८.१०२५ हे. आर. दिनांक २४/०३/१९९४ रोजी संपादित करण्यांत आले असून तळेगांव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ चे ४७४.०६४ हे. आर. क्षेत्र दिनांक २३/०३/२००५ रोजी संपादित करण्यात आले आहे. बहुतांशी क्षेत्रामध्ये पायाभूत विकासाची कामे चालू आहेत. तळेगांव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ३ चे ९४.५६.७० हे. आर. क्षेत्र दिनांक ०९/०३/२००६ रोजी अधिसुचित करण्यांत आले असून सदर क्षेत्रामधून उच्च दाबाची विद्युत वाहिनी जात आहे तसेच पेट्रोल लाईन जात आहे. सभोवती निवासी विकास झाला असल्याने विनाअधिसूचनेची मागणी आहे. तळेगांव औद्योगिक टप्पा क्र. ४ चे २४०४.४६४ हे. आर. क्षेत्र दिनांक १३/०५/२०१७ रोजी अधिसुचित झाले असून

[कृ.मा.प.

सदर क्षेत्राची संयुक्त मोजणी चालू आहे. तळेगांव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ५ चे ३७४.०८८८ हे. आर. क्षेत्र दिनांक २६/११/२००६ रोजी अधिसूचित झाले असून सदर क्षेत्राचे मोबदला वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच मौजे ताजे, बोरज व टाकवे खुर्द, ता. मावळ येथील २३१.००९ हे.आर. क्षेत्र दिनांक २१/०५/२०१९ रोजी अधिसुचित झाले असून संपादनाची कार्यवाही सुरु आहे. बऊर औद्योगिक क्षेत्र ४२४.२६५० हे. आर. दिनांक १८/०३/२००६ रोजी अधिसुचित करण्यात आले असून सदर क्षेत्रामध्ये बाधित खातेदारांचा विरोध असल्याने विनाअधिसूचित करणेची मागणी होत असून सदर कारणांची पडताळणी करण्यात येत आहे.

मावळ तालुक्यामध्ये महाराष्ट्र राज्य कृष्णा खोरे विकास महामंडळासाठी ५६३.८४ हे, राष्ट्रीय व राज्य महामार्गासाठी ५५९.८४ हे. आर, कॅन्टॉन्मेंट बोर्ड १८९.४२१ हे. आर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरीता ४३२०.२११९ हे. आर, डेपो व इतर प्रयोजनांकरीता ३०२६.३८६२ हे.आरअसे एकूण ८१४०.८८१८ हे. आर क्षेत्र संपादित करण्यात आले आहे.

भूसंपादन केल्यामुळे भूमीहीन झालेल्या शेतकऱ्यांना पर्यायी शेतजमीन वा भुखंड देण्याबाबतची कार्यवाही जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेमार्फत करण्यात येते. महामंडळामार्फत संपादित करण्यात येणाऱ्या जमीनींचा भूसंपादनाचा मोबदला खातेदारांशी वाटाघाटी करुन निश्चित करण्यात येतो. सदर मोबदला नविन भूसंपादन कायद्यानुसार निश्चित केला जातो. महामंडळाच्या धोरणानुसार तळेगांव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. १ साठी भुपिडीतांना अथवा त्यांच्या वारासांना १०० चौ.मी. ते १५० चौ.मी. पर्यंतचे भुखंड वाटप करण्यात आले आहेत. तसेच तळेगांव टप्पा क्र. २ साठी महामंडळाच्या धोरणानुसार वाटप केलेल्या प्रकल्पगस्तांना १५% परतावा क्षेत्र म्हणून एकूण ३११ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३०३ प्रकल्पग्रस्तांना देकारपत्र देण्यात आले आहे. देकारपत्र देण्यात आलेल्या ३०३ प्रकल्पग्रस्तांपैकी कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर २२७ प्रकल्पग्रस्तांना भूखंडांचे वाटप करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत महामंडळाचे प्रकल्पग्रस्तांकरीताचे धोरण खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुर्नवसन अधिनियम १९९९ व राष्ट्रीय पुर्नवसन धोरण २००९ याचा समन्वय साधून महामंडळाने प्रकल्पग्रस्तांसाठी पुर्नवसन व पुर्नबहाली धोरण २००९ जाहीर केले. सदर धोरणार्तंगत संबंधितांना संपादित जमीनच्या क्षेत्राच्या १५ टक्के अविकसित भुखंड औद्योगिक वापराकरीता भरपाई रक्कमेच्या दराने अथवा २.२५ टक्के क्षेत्र वाणिज्यीक प्रयोजनासाठी भरपाई रक्कमेच्या दराने देण्याचे निश्चित केले आहे. महामंडळाच्या धोरणानुसार औद्योगिक क्षेत्रातील मोक्याच्या ठिकाणी संपादित क्षेत्राच्या १० टक्के क्षेत्राचा विकसित भुखंड औद्योगिक / निवासी /वाणिज्य अथवा संमिश्र प्रयोजनासाठी त्याच औद्योगिक क्षेत्रामध्यै वाटप केले जातात. सदरचे धोरण हे दि ०१.०७.२०१९ नंतर मा. उच्चाधिकार समितीमध्ये मंजूर झालेल्या दर व त्याअनुषंगाने कलम ३२ (२) नुसार निवाडा घोषित केलेल्या जमीनींच्या संपादनाकरीता आहे.

महामंडळाने संपादित केलेल्या जमीनींवर नियमाप्रमाणे भुखंडाचा आराखडा तयार करुन सदरचे ठिकाणी पायाभूत सुविधा (रस्ते, पाणी, वीज इत्यादी) पुरविण्यात येतात. व त्यानंतर गरजू उद्योजकांना उद्योगासाठी तसेच व्यापारासाठी भुखंडाचे वाटप करण्यात येते. भुखंडाचे वाटप करताना करण्यात येणाऱ्या करारनाम्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना प्राथम्य देण्याबाबतच्या अटीचा समावेश आहे.

त्यानुसार स्थानिक बेरोजगारांना प्राधान्याने त्यांचे गुणवत्तेनुसार रोजगार उपलब्ध करुन देण्यात येतो स्थानिकांना रोजगारात प्राधान्याविषयी शासनाचे धोरणांची अंमलबजावणी जिल्हा उद्योग केंद्र यांचेमार्फत केली जाते. मावळ तालुक्यात तळेगाव परिसरात मोठया प्रमाणावर औद्योगिकरण झाल्यामुळे रोजगार उपलब्ध होऊन आर्थिक विकास झाला आहे. स्थनिक रोजगाराबाबतच्या धोरणातील त्रुटी दूर करून त्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कायदा करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

H1/751-19.

***************

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्प) अधिवेशन

**सर्वश्री सुनिल प्रभू , दौलत दरोडा, महेंद्र थोरवे, अबु आझमी , वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.**

**" रिलायन्स गॅस कंपनीने नागोठणे ते दहेज (गुजरात राज्य ) (ता. पेण, जि. रायगड) पर्यंत गॅस पाईप लाईन टाकण्यासाठी जमीनी उपलब्ध करून दिलेल्या प्रकल्पबाधीत शेकडो शेतकऱ्यांना जमीन व पिकांची नुकसान भरपाई अद्यापपर्यंत दिली नसल्याची बाब दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, त्यातच सदरहू रिलायन्स कंपनीने जमीन व पिकाची नुकसान भरपाई देताना काही शेतकऱ्यांना ८० हजार रूपये प्रति गुंठा तर काहींना ५ ते ८ लाख रुपये प्रतिगुंठा भाव देण्यात येणे, सदर प्रकरणात कंपनीने भेदभाव करून चुकीचा भाव दिल्यामुळे या विरोधात शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन करून निषेध व्यक्त करणे, सदर प्रकरणी बैठक घेऊन निर्णय घेण्याचे शासनाने आश्वासन देऊनही अद्याप यावर कोणतीही कार्यवाही करण्यात न आल्याने सदरहू प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांवर झालेला अन्याय, यामुळे प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "**

### मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

**दहेज-नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्प रिलायन्स गॅस पाईपलॉईन कंपनी मार्फत राबविण्यात येत असून सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्य पेट्रोलियम व प्राकृतिक गॅस विनीयामक बोर्ड, नवी दिल्ली यांची मान्यता आहे.दहेज-नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्प गुजरात राज्यातील दहेज ते महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्हयातील नागोठणे पर्यंत गेली आहे. सदर पाईपलाईन महाराष्ट्रातील पालघर, ठाणे व** रायगड जिल्ह्यातून गेली आहे. सदर प्रकल्पासंदर्भातील कार्यवाही जमिनीच्या वापराच्या हक्काचे संपादन केंद्र शासनाच्या प्रचलित पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपालाईन (जमीनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम १९६२ व नियम १९६३ मधील तरतुदीनुसार करण्यात येते.

वाढीव नुकसान भरपाई मिळण्यासाठी श्रीमती चागुंणा सीद व इतर यांनी सक्षम प्राधिकारी, दहेज नागोठणे इथेन पाईपलाईन यांच्या कार्यालयासमोर दिनांक ०२/०१/२०२० रोजी आंदोलन केले होते.

पिकांची नुकसान भरपाई बाबत कोकण विभागातील प्रमुख पिक भाताचे असल्याने भाताची नुकसान भरपाई सरसकट सर्व जमिनीला देण्याचा निर्णय संपादन संस्थेने घेतला व त्यासाठी प्रकल्प क्षेत्रातील कृषी उत्पन्न बाजार समितीकडून (पालघर, ठाणे व रायगड जिल्हा) दर मागविण्यात आले होते. त्यातील भिंवडी कृषी उत्पन्न बाजार समितीचा उच्चतम दर स्विकारुन खालीलप्रमाणे पिकांचे नुकसान भरपाई प्रती गुंठा निर्धारीत केली आहे.

| | |
|---|---|
| प्रती गुंठा नुकसान भरपाईचा दर :- | रु. ८८० |
| १००% दिलासा रक्कम :- | रु. ८८० |
| | रु.१७६० |
| ३ हंगामी पिकांची नुकसान भरपाई:- | X ३ |
| एकुण नुकसान भरपाई :- | रु. ५२८० |

इतर नुकसान भरपाई ही प्रत्यक्ष जागेवर झालेली नुकसान भरपाई देय आहे. म्हणजेच जमीनीची नुकसान भरपाई + पिकांची नुकसान भरपाई व इतर नुकसान भरपाई सबंधित शेतकऱ्यांना देय

रेटा H/1750-1 (8ω-9-2020)

आहे. सदरची रक्कम ही संपादन संस्थेने सक्षम प्राधिकारी यांचे खात्यात जमा केल्यानंतर सक्षम प्राधिकारी यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्र धनादेशाव्दारे संबंधित शेतकऱ्यांना दिली जातात.

सदर अधिनियमानुसार देय असलेली रक्कम ही कमी असल्यामुळे त्यापेक्षा जास्त दराने रु. ८०,०००/- प्रती गुंठा इतक्या दराने जमिनीची, पिकांची व इतर नुकसान भरपाई अशी एकंदरीत नुकसान भरपाई देण्याचे संपादन संस्थेने कळविले. त्याप्रमाणे पेण तालुक्यातील एकूण संपादन केलेल्या २२.४२ हे.आर नुकसान भरपाई २८०१ शेतकऱ्यांना रक्कम रुपये १७,९९,१५,२७३/- इतक्या रकमेचे वाटप सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावरुन करण्यात आले. उर्वरीत ६३ शेतकऱ्यांना क्षेत्र ६.२५.८३ हे.आर संपादन जमीनीची नुकसान भरपाई रक्कम रुपये ५ कोटी ५० हजार वाटप करण्याचे शिल्लक असून संपादन संस्थेकडे मागणी केली आहे.

संपादन संस्थेने विविध कारणास्तव प्रकल्प बाधित शेतकऱ्यांची रक्कम सक्षम प्राधिकारी यांचे खात्यात जमा केलीली नाही. संपादन संस्थेने वरील ६३ बाधित जमीनीच्या मालकांना देय असलेली ५ कोटी ५० हजार रक्कम सक्षम प्राधिकारी यांच्या खात्यात जमा केली नाही. रक्कम जमा केल्यानंतर सदर रक्कमेची वाटप करण्याची तजविज ठेवली आहे.

श्री निलेश तांबोळी यांची मौजे तळेखार येथील सर्व्हे नंबर २/१ क्षेत्र ०.०५.२५ हे.आर जमीनीच्या वापराच्या हक्काच्या संपादन कलम ६(१) नुसार दहेज-नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्पासाठी केले आहे. सदर जमीनीची नुकसान भरपाई प्रती गुंठा रुपये ८०,०००/- या दराने वाटप केली आहे. तसेच प्रकल्पकामी पाईपलाईन मार्गीकेच्या सिमांकनाबाहेरील जमीनीचे इतर नुकसान झाले आहे. मात्र संपादन संस्थने सादर केलेल्या प्रस्तावानुसार खालील नमूद केल्याप्रमाणे जमीनीची व इतर नुकसान भरपाई अदा केली आहे.

| सर्व्हे नंबर | RoU संपादन जमीनीचे क्षेत्र चौ.मी. | नुकसान भरपाईचा प्रकार | | | इतर नुकसान भरपाई रुपये | जमीनीच्या नुकसान भरपाईसह इतर नुकसान भरपाई रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जमीनीची नुकसान भरपाई प्रती चौ.मी. रुपये ७४७.२० | पिकांची नुकसान भरपाई प्रती चौ.मी. रु. ५२.८० | एकूण नुकसान भरपाई | | |
| २/१ | ५२५ | ३,९२,२८० | २७,७२० | ४,२०,००० | ६,३०,००० | १०,५०,००० |

प्रस्तुत जमीनीची एकूण नुकसान भरपाई रुपये ४,२०,००० अदा केली आहे. अधिक इतर नुकसान भरपाई रुपये ६,३०,००० अशी एकूण १०,५०,००० अदा केली आहे. जमीन मालक श्री निलेश ताबोंळी यांनी जमीनीची अधिक इतर नुकसान भरपाईच्या रकमेची बेरीज करुन संपादन क्षेत्र ५२५ चौ.मी परिगणता करुन प्रती गुंठा रुपये २ लाख दराप्रमाणे नुकसान भरपाई मिळाल्याची चुकीचा समज इतर शेतकऱ्यांना करुन दिला आहे. रु. ५ ते ८ लाख प्रतीगुंठा भाव देण्यात यावा ही आंदोनलकर्त्या शेतकऱ्यांची मागणी आहे. पेण व खालापूर तालुक्यातील शेतक-यांना निर्धारीत केलेला प्रती गुंठा रु. ८०,०००/- हा दर मान्य नसल्याने वाढीव दराने नुकसान भरपाई मिळण्यासाठी त्यांनी उपविभागीय अधिकारी पेण कार्यालयासमोर केलेल्या आमरण उपोषण संदर्भात तत्कालीन राज्यमंत्री (बंदरे, वैद्यकीय शिक्षण, माहिती व तंत्रज्ञान, अन्न

H11750-19

व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण तथा पालकमंत्री रायगड जिल्हा) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२०१८ रोजी उपोषणकर्ते, शासकीय अधिकारी, संपादन संस्थेचे प्रतिनिधी, सक्षम प्राधिकारी, यांची बैठक आयोजित केली होती. सक्षम प्राधिकारी यांनी वाढीव नुकसान भरपाईबाबत कार्यवाही करावी, असे बैठकीत निर्देश दिले. प्राप्त झालेल्या १४८ अर्जांचे पंचनामा पथकांनी प्रत्यक्ष जागेवर पंचनामे केले आहे, पंचनाम्याच्या अनुषंगाने कंपनीने त्यांच्या स्तरावर मोबदल्याचे वाटप केले आहे, त्या दराने कंपनीने शेतकऱ्यांना मोबदला वाटप करावा याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी दिनांक १६/०२/२०१९ व दिनांक १९/०२/२०१९ रोजीच्या पत्रानुसार कंपनीला कळविले आहे. याबाबत कंपनीने अद्याप कार्यवाही केली नाही.

तसेच शेतकऱ्यांच्या सदर मागण्याबाबत दि. ०१/०७/२०१९ रोजी तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन मुंबई येथील बैठकीत सक्षम प्राधिकारी, दहेज-नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्प, रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. चे प्रतिनिधी व शेतकरी यांनी एकत्र येऊन मोबदल्याबाबत तोडगा काढणेबाबत आदेश दिले. उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुर्नस्थापन सनियंत्रण समिती,वरळी, मुंबई यांचे कार्यालयात दि. ११/०९/२०१९ रोजी यांचे अध्यक्षतेखाली सक्षम प्राधिकारी, दहेज-नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्प, रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. चे प्रतिनिधी व शेतकरी यांची संयुक्त बैठक झाली. सदर बैठकीत निर्णय न झाल्याने पुन्हा संबंधितांची बैठक घेऊन सविस्तर चर्चा करुन सकारात्मक तोडगा काढण्याचे निर्देश दिले.

सदर विषयाच्या अनुषंगाने दिनांक ४/३/२०२० रोजी संबंधितांसमवेत बैठक घेण्यात आली व सदर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत ज्या शेतकऱ्यांना मोबदला प्राप्त झाला नाही अशा उर्वरित ६३ बाधित शेतकऱ्यांची मोबदल्याची रक्कम सक्षम प्राधिकारी यांचेकडे रिलायन्स गॅस कंपनीने जमा करावी. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी पाईपलाईन खोदल्यानंतर पुर्ववत समतल झाल्या नाहीत तसेच ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी नापिक झाल्या आहेत, असे संबंधित शेतकरी, रिलायन्स गॅस कंपनीचे प्रतिनिधी व जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्राधिकृत केलेल्या पथकामार्फत सदर क्षेत्राची संयुक्त पाहणी करावी, असे निर्देश दिले आहेत.

*******************

H/1750-2

महाराष्ट्र विधानसभेमध्ये मा.सर्वश्री. राजू कारेमोरे व इतर यांनी दाखल केलेली लक्षवेधी सूचना

सन २०२० च्या महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय (दुसरे) अधिवेधशनात मा. सर्वश्री. राजू कारेमोरे, नरेंद्र भोंडेकर, विनोद अग्रवाल, विजय रहांगडले, बंटी भांगडिया, मनोहर चंद्रिकापुरे, सहसराम कोरोटे, विकास ठाकरे, बळवंत वानखडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री राजु पारवे, सुभाष धोटे, अमिन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. कुणाल पाटील, हिरामण खोसकर, श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली लक्ष्यवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"शासनाने भंडारा व गोंदिया जिल्ह्यात आधारभूत धान खरेदी केंद्र सुरु करणे, या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या केंद्रावर त्यांचे धान विक्रीसाठी माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये नेले असता धान खरेदी केंद्रावर बारदाने नसल्यामुळे शेतकऱ्यांचे धान खरेदी करण्यास दिलेला नकार, माहे डिसेंबर, २०१९ व माहे जानेवारी २०२० या कालावधीत या जिल्ह्यात पाऊस झाल्यामुळे व धान खरेदी केंद्रावर त्यांचे धान खरेदी न केल्यामुळे पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, यासंदर्भात चौकशी करण्याची व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याची होत असलेली मागणी, धान खरेदी ही न्यूडल एजन्सी आपल्या सबएजन्टस संस्थेकडून करुन घेत असल्यामुळे खुल्या बाजारात धानाचे भाव व आधारभूत किंमतीचे भाव व त्यावरील बोनस यामध्ये मोठी तफावत असल्यामुळे आधारभूत धान खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांकडून आलेले धान कमी व व्यापाऱ्यांचे धान जास्त घेण्यात येत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय, प्रत्येक तालुक्यात २ धान खरेदी केंद्र प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात यावीत अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी मा. कृषी मंत्री यांचेकडे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी लेखी स्वरुपात केली असणे, मागणीवर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

मा. श्री.छगन भुजबळ, मंत्री ,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे निवेदन.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून शेतकऱ्यांना हमी किंमतीपेक्षा कमी किंमतीने (डिस्ट्रेस सेल) धान्य विकावे लागू नये, म्हणून ही योजना राबविण्यात येते.

त्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या अभिकर्ता संस्थांमार्फत (बिगर आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र स्टेट को- ऑप. मार्केटिंग फेडरेशन, मुंबई व आदिवासी क्षेत्रात,महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक ) राज्यात F.A.Q (Fair Average Quality) दर्जाच्या धान व भरडधान्याची खरेदी करण्यात येते.

राज्यात हंगाम २०१९-२० मध्ये शासन निर्णय, क्र. खरेदी-१०१९/प्र.क्र.९८/नापु-२९, दि. ०९ सप्टेंबर, २०१९ नुसार, केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार धान व भरडधान्याची खरेदी करण्यात येत आहे.

हंगाम २०१९-२० मध्ये, संबंधित जिल्हाधिकारी यांनी मंजूर केल्यानुसार भंडारा मधील ८६ व गोंदिया जिल्ह्यात ११४ (७० मार्कफेड व ४४ आदिवासी विकास महामंडळ) खरेदी केंद्र सुरु करण्यात आली आहेत.

खरेदी केंद्रांवर खरेदी करण्याकरिता केंद्र शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार जुना व नवीन बारदाना वापरण्यात येत आहे. त्यापैकी नवीन बारदाना अभिकर्ता संस्थांना ज्यूट कमिशनर ऑफ इंडिया यांच्याकडून खरेदी करुन अभिकर्ता संस्थांना त्यांच्या मागणीनुसार योग्यरित्या पुरविण्यात आला आहे. जुना बारदाना अभिकर्ता संस्थांद्वारे उपलब्ध करुन घेऊन वापरण्यात येत आहे. दोन्ही अभिकर्ता संस्थांकडून प्राप्त माहितीनुसार बारदान्या अभावी शेतकऱ्यांचा धान खरेदी झाला नाही अशी बाब अथवा तक्रार आढळून आली नाही.

माहे डिसेंबर २०१९ व जानेवारी २०२० दरम्यान राज्यात अवकाळी पाऊस झालेला होता. अभिकर्ता संस्थांच्या अहवालानुसार सदर पावसामुळे शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर विक्री करण्याकरिता आणलेला धान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांनी तसेच संबंधित बाजार समितीने उपलब्ध ताडपत्र्यांनी धान झाकुन सुरक्षित साठवून ठेवला होता. तथापि, काही खरेदी केंद्रावर सखल भागात शेतकऱ्यांकडील धान थोड्याफार प्रमाणात भिजला असल्याचे निदर्शनास आले होते.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाकडून प्रतिपूर्ती मिळणारी योजना असल्याने सदर योजनेंतर्गत खरेदी करावयाचा धान हा केंद्र शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार असला पाहिजे अशी केंद्र शासनाची अट आहे. तथापि, राज्यातील शेतकऱ्यांचा पावसामुळे भिजलेला धान खरेदी करण्याबाबत प्राप्त लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने दि. २७ डिसेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास प्रस्ताव सादर केला आहे. तथापि, खरेदी केंद्रांवर खरेदी केलेल्या धानाचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

राज्य शासनाने राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांची अडचण विचारात घेऊन, शासन निर्णय, क्र.खरेदी-१०१९/प्र.क्र.१४६/नापु-२९, दि. १२ डिसेंबर, २०१९ अन्वये रु.५००/- प्रतिक्विंटल इतकी प्रोत्साहनपर राशी दिलेली आहे. तसेच राज्य विधानमंडळाच्या नागपूर अधिवेशनात मा. मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या घोषणेस अनुसरुन शासन निर्णय, क्र.खरेदी-१०१९/प्र.क्र.१४६/नापु-२९, दि.०४ मार्च, २०२० अन्वये अधिकची रु. २००/- प्रतिक्विंटल इतकी वाढीव प्रोत्साहनपर राशी देण्यात येत आहे.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान खरेदी ही फक्त शेतकऱ्यांकडून व्हावी याकरिता शासन निर्णय क्र. खरेदी-१०१९/प्र.क्र.९८/ना.पु.२९, दि. ०९ सप्टेंबर, २०१९ अन्वये धान खरेदी करताना जमिनीचा नमुना ७/१२, नमुना ८अ तसेच कृषी विभागाकडून जिल्हानिहाय जाहीर केलेल्या पीक उत्पादकता आदि बाबी विचारात घेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना अभिकर्ता संस्थांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार धान खरेदी शेतकऱ्यांकडूनच होईल याची दक्षता अभिकर्ता संस्थांकडून खरेदी केंद्रांवर घेण्यात येते.

शासन निर्णय क्र. खरेदी-१०१९/प्र.क्र.९८/नापु-२९, दि. ०९ सप्टेंबर, २०१९ नुसार प्रत्येक गाव एका विशिष्ट खरेदी केंद्रास जोडण्यात यावे अशी तरतूद करण्यात आली आहे. त्याकरिता शेतकऱ्यांना धान विक्री करणे सोयीचे व्हावे, विक्री केलेल्या धानाचे चुकारे लवकर प्राप्त व्हावेत व व्यवहारात पारदर्शकता यावी यासाठी शासनाने केंद्र शासनाच्या निदेशांनुसार खरेदीची ऑनलाईन प्रणाली सुरु केली आहे.

**************************

महाराष्ट्र विधानसभेमध्ये मा.श्री.संतोष बांगर, विधानसभा सदस्य यांनी दाखल केलेली लक्षवेधी सूचना

सन २०२० च्या महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा.श्री.संतोष बांगर, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-

"हिंगोली तालुक्यामध्ये असलेल्या २१० गावांत स्वस्त धान्य दुकानामध्ये ई-पॉस मशिद्वारे अन्नधान्याचे वाटप न करता नियमापेक्षा जास्त धान्य वाटप करुन तहसिल कार्यालयातील अधिकाऱ्यांनी रेशनमाफियांना हाताशी धरुन ९ हजार क्विंटलचा धान्य घोटाळा केल्याचे नुकतेच माहे जाने,२०२० मध्ये उघडकीस येणे, सध्यस्थितीमध्ये रेशन अन्नधान्याची किंमत बाजारभावानुसार पावणे दोन कोटी रुपयांचा वर असणे, यापुर्वी नांदेड व परभणी जिल्हयामध्ये धान्य घोटाळयाचे प्रकरण गाजलेले असतांनाच हिंगोली तालुक्यामध्ये देखील स्वस्त धान्य दुकानातून वाटप करावयाचे अन्नधान्य गरजू गोरगरीब नागरिकापर्यत न पोहचवता दलालांनी डल्ला मारल्याचा घडलेला प्रकार, गेल्या आठ ते दहा महिन्यांपासून ई-पॉस मशीनद्वारे अन्नधान्य वाटप न करता ९ हजार क्विंटलच्या वर अन्नधान्य काळया बाजारात विक्रीला गेल्याचे वर्तविण्यात येत असणे, याकडे शासनाच होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गोंधळ व गैरव्यवहार थांबविण्याबाबत करावयाची ठोस कार्यवाही व यास जबाबदार असणाऱ्याविरुध्द तातडीने करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

श्री.छगन भुजबळ, मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे निवेदन.

सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक धोरणान्वये, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाद्वारे राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात येत असून याबाबत शासनाने दि.१८ मे, २०१६ रोजी पात्र लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून ई-पॉसद्वारे शिधावस्तूचे वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. माहे मे, २०१८ पासून संपूर्ण राज्यात Aadhar enabled Public Distribution System (AePDS) प्रणाली यशस्वीपणे सुरु करण्यात आली.

हिंगोली तालुक्यातंर्गत एकुण रास्तभाव दुकानांची संख्या १६५ आहे. जिल्हा पुरवठा कार्यालयातून हिंगोली तालुक्याचे माहे जानेवारी, २०१९ ते जुलै, २०१९ या कालावधीत लाभार्थी संख्येनुसार अंत्योदय, प्राधान्य कुटुंब लाभार्थी व शेतकरी लाभार्थी या तीन योजनेंतर्गत १०० टक्के देय नियतन ९४७१६.५० क्विंटल असे आहे. तालुक्याचे ऑनलाईन नियतन विचारात घेऊन जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने योजनानिहाय ६७३८६ क्विंटल अन्नधान्याचे नियतन उपलब्ध करुन दिले होते. तहसिल कार्यालय, हिंगोली यांचेमार्फत माहे जानेवारी, २०१९ ते जुलै, २०१९ या कालावधीत उपलब्ध

करुन दिलेल्या नियतनापैकी ७२४७४ क्विंटल धान्य वाटप करण्यात आले व उक्त वाटप केलेल्या धान्यापैकी ६२५७५ क्विंटल धान्य ऑनलाईन ई-पॉस मशीनद्वारे वितरीत झालेले आहे व उर्वरीत ९८९९ क्विंटल धान्य ऑफलाईन पध्दतीने वितरीत केलेले आहे. ९८९९ क्विंटल धान्य ऑफलाईन वितरीत केल्याबाबत तहसिलदार, हिंगोली यांना देण्यात आलेल्या ज्ञापनाच्या अनुषंगाने तहसिलदार, हिंगोली यांनी दि.१४ जानेवारी, २०२० रोजी सादर केलेला खुलासा संयुक्तीक वाटत नाही. त्यामुळे तहसिलदार हिंगोली यांचा खुलासा अमान्य करण्यात येऊन त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्याकडून विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सादर करण्यात आला आहे. तसेच तहसिलदार यांना सदर प्रकरणात जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द नियमाधीन कार्यवाही करुन अहवाल सादर करणेकरिता सुचित केलेले आहे.

दि.१८ जुलै, २०१८ रोजी जिल्हा नांदेड येथे अन्नधान्य गैरव्यंवहाराबाबत पोलीस विभागामार्फत नांदेड व हिंगोली जिल्हयातील संबंधित वाहतूक कंत्राटदार यांचेविरुध्द गुन्हा नोंद झालेला असून राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून मा.न्यायालयात दोषरोपपत्रे दाखल करण्यात आली. सदर गुन्हा मोठया व गंभार स्वरुपाचा असून यामुळे शासनाचीही प्रतिमा मलिन झाली होती. ही बाब विचारात घेऊन नांदेड व हिंगोली जिल्हयाचे वाहतुक कंत्राट रद्द करण्याची व पर्यायी व्यवस्था करण्याची कार्यवाही कार्यान्वित आहे. हिंगोली जिल्ह्याचे वाहतूक कंत्राटदार समाविष्ट असल्यामुळे त्यांचेकडून अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तुचा अपहार/चोरी/काळाबाजार यावरील दंडात्मक रक्कम रु.६१,१०,५९५/- वसुल करण्यात आलेली आहे.

तहसिल कार्यालय, परभणी येथील शासकीय गोदामाची तपासणी केली असता धान्याचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्याने सदर प्रकरणात श्री.दिलीप कच्छवे, जिल्हा पुरवठा अधिकारी, श्री.संतोष रुईकर, तहसिलदार, परभणी यांना विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेशान्वये निलंबित केले आहे. तसेच, श्री.सी.बी.पांचाळ, नायब तहसिलदार, परभणी व श्री.अनिल आंबेराव, गोदामपाल, परभणी यांना जिल्हाधिकारी, परभणी यांच्या आदेशान्वये निलंबित केले आहे. उपरोक्त अधिकारी कर्मचारी यांचेवर विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. तसेच गुन्हयातील ३७ आरोपींपैकी १६ आरोपींविरुध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गैरव्यवहार थांबविण्याबाबत शासनाकडून अन्नधान्याची वाहतुक करणाऱ्या ट्रकला GPS बसविण्यात आले आहे. गाडयांना हिरवा रंग देण्यात आलेला आहे. त्यावर नामफलक लावण्यात आलेला आहे. याबाबत वाहतुक कंत्राटदारांना वेळोवेळी लेखी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री अतुल भातखळकर, संजय केळकर, राणाजगजीतसिंह पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री राम कदम, अभिमन्यु पवार, दिपक चव्हाण, अशोक पवार, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षिरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, श्री मंगेश कुडाळकर, डॉ. भारती लव्हेकर, श्री कालीदास कोळंबकर, डॉ. बालाजी किणीकर,सर्वश्री.प्रकाश फातर्पेकर,संजय पोतनीस,चंद्रकांत पाटील,महेंद्र दळवी,किशोर पाटील,प्रमोद पाटील,भरतशेठ गोगावले,दिलीप लांडे,अमीन पटेल,श्रीमती.सुलभा खोडके,पृथ्वीराज चव्हाण,कुणाल पाटील,सुरेश वरपुडकर,विक्रमसिंह सावंत,चंद्रकांत जाधव,ऋतुराज पाटील,संजय जगताप,विकास ठाकरे,अमित झनक,सुभाष धोटे,श्रीमती प्रतिभा धानोरकर,सर्वश्री.मोहनराव हंबर्डे,बळवंत वानखेडे,राजु पारवे,राजु आवळे, संजय रायमुलकर, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे.

"तारापूर, (जि.पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रातील ए.एन.के. फार्मा कंपनीत दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी झालेल्या महाशक्तीशाली स्फोटात ७ जण गंभीररीत्या जखमी होऊन ८ जणांचा झालेला मृत्यू, तसेच अन्य ३ कंपन्यासह करोडो रुपयांचे झालेले नुकसान, तसेच दिनांक ०४ फेब्रुवारी २०२० रोजी सायंकाळी ५.१५ च्या सुमारास तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्र. टी-१०१, हर्शुल केमिकल्स प्रा. लि./श्री साई एन्टरप्रायजेस या जनरल पर्पज थिनर उत्पादन घेणाऱ्या कारखान्याला भीषण आग लागून दोन कामगार गंभीररित्या जखमी होणे, सदर कारखान्यांना आगी लागल्यामुळे पालघर जिल्हयासह राज्याला हादरवून सोडणाऱ्या या स्फोटामुळे तारापूर एम.आय.डी.सी. येथील रासायनिक कारखाने बॉम्बपेक्षाही घातक असल्याचे सिध्द झालेले असणे, गेल्या २ वर्षामध्ये या ठिकाणी घडलेल्या भीषण स्फोटांमध्ये आणि वायुगळतीमुळे २१ जणांचा तडफडून मृत्यू होणे तसेच अन्य १५ कामगार कायमचे जायबंदी झालेले असणे, तारापूर एम.आय.डी.सी. हि सर्वाधिक प्रदूषण ओकणारी देशातील पहिल्या क्रमांकाची एम.आय.डी.सी. असून या एम.आय.डी.सी.मुळे तब्बल ९४ टक्के पर्यावरण घातक झाले असून फक्त ६ टक्के इतकीच शुध्द हवा आणि पाणी उरलेले असणे, याबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्याकडे लक्ष वेधूनही शासनाचे झालेले दुर्लक्ष, तसेच सदर स्फोटांमुळे व आगीमुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या

वारसांना तात्काळ योग्य ती आर्थिक मदत देण्याची तसेच सदरहु तारापूर औदयोगिक वसाहतीतील कारखान्यातील कामगारांना केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने सन २०१५ मध्ये रासायनिक कारखान्यांनमुळे निर्माण होणारे धोके लक्षात घेऊन कारखान्यांनी घ्यावयाची खबरदारी व उपाययोजना तसेच उद्भवणाऱ्या अपघातातून सहाय्य करण्यासाठी आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची कठोरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया ."

---

मा. मंत्री (कामगार) यांचे निवेदन

पालघर जिल्हयातील बोईसर येथील तारापूर औद्योगिक वसाहतीमधील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनायाकडे एकूण ९९३ विविध कारखाने नोंदणीकृत असून त्यापैकी १९ अतिधोकादायक, २१३ धोकादायक, २८३ रासायनिक व ४७८ इतर कारखाने आहेत.

पालघर जिल्हयातील बोईसर तारापूर औद्योगिक वसाहतीमधील मे. ए.एन.के फार्मा प्रा. लि. या रासायनिक कारखान्यात दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी उत्पादन प्रक्रिये दरम्यान रिॲक्टरमध्ये झालेल्या स्फोटात ६ कामगारांचा व कारखान्याच्या आवारात राहणाऱ्या कुटुंबियांपैकी २ व्यक्ती अश्या एकूण ८ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. तसेच सदर दुर्घटनेत २ लहान मुलींसह ७ जण जखमी झाले आहेत. यापैकी ६ जणांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले असून एक जण अद्याप उपचार घेत आहे.

सदर दुर्घटनेत मृत कामगारांच्या वारसास मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत प्रत्येकी ५ लक्ष इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी देण्यात आलेली आहे.

सदर दुर्घटनेत कारखान्याच्या जवळपास असलेल्या मे.गॅलेक्सी सरफेक्टन्टस प्रा.लि. कारखान्याचे सुमारे ५१ लाख रुपयाचे, मे.मॅक्रोटेक पॉलीकेम प्रा.लि. या कारखान्याचे सुमारे २ लक्ष रुपयाचे व मे.विकास इंडस्ट्रिज अँड केमिकल्स प्रा.लि. या कारखान्याचे सुमारे २०,०००/- रुपयांचे नुकसान झाले आहे.

हर्शुल केमिकल प्रा.लि., पालघर या रासायनिक कंपनीत दि.०४.०२.२०२० रोजी झालेल्या अपघातात २ कामगार भाजून जखमी झाले आहेत. एक कामगार अंदाजे ४० टक्के भाजला असून त्यांचेवर सध्या थुंगा हॉस्पीटल,मीरा रोड येथे उपचार सुरु आहेत. तसेच दुसऱ्या एका कामगाराच्या हाताला किरकोळ भाजण्याच्या जखमा झाल्या असून त्याला त्याच दिवशी उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

सदर आगीच्या घटनेची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत करण्यात आली असून आढळून आलेल्या अनियमिततेकरिता भोगवटादारावर न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

माहे जानेवारी २०१८ ते ११ जानेवारी २०२० या कालावधीतील स्फोट व वायुगळतीच्या घटनांमध्ये आतापर्यंत १६ कामगारांसह इतर २ व्यक्तींचा मृत्यू झाला असून ७७ कामगारांसह इतर ५ व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०१७-१८ मध्ये देशातील औद्योगिक क्षेत्रांचा सर्वसमावेशक पर्यावरण मूल्यांकन केले असता १०० औद्योगिक क्षेत्रांचा प्रदूषित क्षेत्रे म्हणून आढळली असून त्यामध्ये महाराष्ट्र, तारापूर औद्योगिक क्षेत्र हे गंभीर प्रदूषित क्षेत्र म्हणून आढळले असून त्याचा व्यापक पर्यावरण प्रदूषण निर्देशांक ९३.६९ इतका आढळून आला आहे.

सदर औद्योगिक क्षेत्राचा व्यापक पर्यावरण प्रदूषण निर्देशांक सुधारण्याच्या दृष्टिकोनातून म.प्र.नि. मंडळाने सर्व भागधारकांसोबत बैठक घेऊन सर्वसमावेशक सुधारीत कृती आराखडा तयार केला असून तो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर केला आहे.

तसेच पर्यावरणीय मानकांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांना उद्योग बंद करण्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्देश दिले आहेत. तसेच मागील ५ वर्षामध्ये पर्यावरणीय मानकांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर पर्यावरणाची हानी केल्याबद्दल भरपाईच्या स्वरुपात दंडात्मक कार्यवाही केली आहे.

सदर अपघाताची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अग्नीशामक विभाग व पोलीस विभाग यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

चौकशीत असे निदर्शनास आले की, सदर कारखान्याने कारखाने अधिनियमातंर्गत परवाना घेतलेला नव्हता.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कन्सेंट ज्या रसायनाच्या उत्पादनासाठी होते त्यापेक्षा वेगळ्या रसायनाचे उत्पादन चालू होते. तसेच कारखाना व्यवस्थापनाने अग्निशमन विभागाकडून अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आलेले नव्हते. कारखाना व्यवस्थापनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त बांधकामाची परवानगी न घेताच बांधकाम सुरु करुन सदर इमारतीमधे उत्पादन प्रक्रिया सुरु केली होती.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने कारखान्याच्या संचालकांविरुध्द कारखाने अधिनियम १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ च्या अंतर्गत आढळून आलेल्या भंगाबाबत दोन फौजदारी खटले (क्र. २६३५/२०२० व २६३६/२०२०) मा.न्यायालयात दाखल केलेले आहेत. पोलीस विभागाने कारखान्याचे संचालक श्री.नटवरलाल पटेल यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३०४अ, २८६, ३३७, ४२७ च्या भंगाकरिता क्रमांक ००१४/२०२० अन्वये गुन्हा दाखल केला

आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १३.०१.२०२० रोजी सदर कारखान्यास कारखाना बंद करण्याचे आदेश पारीत केलेले आहेत.

सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कोकण भवन यांचे अध्यक्षतेखाली दि.१५.०१.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे. तसेच राज्यातील रासायनिक व धोकादायक कारखान्यांचे औद्योगिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा परिक्षण (Safety Audit) व उपाययोजना सुचविण्याबाबत दि.१७.०१.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निहाय समिती गठित करण्यात आली असून सहा महिन्यांचे आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. सदर समितीने गठीत केलेल्या पथकाव्दारे धोकादायक व रासायनिक कारखान्यांचे सुरक्षा विषयक परिक्षण करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

---***---

(११)

लक्षवेधी सूचना
गृह विभाग

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक (गट-ब) यांच्या बदल्याबाबत अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या-१२, मंत्रालय, मुंबई दिनांक २८ एप्रिल, २०१५ आणि अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.११४/कार्या-१२ मंत्रालय, मुंबई दिनांक १५ जून, २०१७ अन्वये खात्यांतर्गत दुय्यम निरीक्षक पदावरुन निरिक्षक पदावर पदोन्नती देताना शासनाच्या वरील दोन्ही अधिसूचनांचे तंतोतत पालन करण्यात येत असून त्या अनुषंगोन नागपूर, अमरावती, औरंगाबाद या महसूल विभागातील मंजूर पदापैकी ८० टक्के पदे भरण्यात येणे, वरील दोन्ही अधिसूचनाचे पालन हे फक्त पदोन्नती देते वेळीच केले जाणे, मात्र वरील अधिसूचनांमध्ये नमूद असतांनाही निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांच्या बदल्यांबाबत सदर अधिसूचनांना केरारची टोपली दाखविण्यात येणे, एका संवर्गात सहा वर्षांपेक्षा जास्त काळ कोणत्याही वर्ग-२ च्या अधिकाऱ्यास थांबता येणार नसल्याची बाब स्पष्ट नमूद असतांनाही विशेष करुन कोकण-२ विभागात असणारे अधिकारी गेल्या दहा वर्षापासून त्याच संवर्गात कार्यरत असल्याने त्यांचे व मद्यविक्रत्यांचे संबंध घनिष्ठ होऊन त्याचा महसूलावर निश्चितच परिणाम होणे, सद्यस्थितीत कोकण-२ संवर्गात कार्यरत असणारे निरिक्षक हे जास्तीत जास्त उपअधिक्षक पदावर पदोन्नतीस पात्र असतांना देखिल संबधित अधिकारी कोकण-२ हा संवर्ग सोडून इतर संवर्गात जाणेस इच्छुक नसल्याने सर्रास पदोन्नती नाकारणे, यामध्ये नक्कीच त्यांचा आर्थिक फायदा असल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच कोकण-२ संवर्गात एकही अकार्यकारी पद नसल्याने संबधित अधिकारी गेल्या १० ते १२ वर्षापासून कार्यकारी पदावरच काम करत असल्याने महाराष्ट्रातील इतर अधिकाऱ्यांवर वर्षानुवर्षे अकार्यकारी पदावरच काम करण्याची वेळ येणे, वरील दोन्ही अधिसूचनांचा फक्त पदोन्नतीकरिताच नव्हे तर बदली करातांनाही तंतोतंत पालन झाल्यास सर्व अधिकाऱ्यांना समान कामाची संधी प्राप्त होईल व अधिकाऱ्यांवर अन्याय होणार नाही, तसेच पदोन्नती नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांची देखील इतर संवर्गात अकार्यकारी पदावर बदली केल्यास पदोन्नती नाकारणे अधिकारी देखील पदोन्नती स्विकारतील आणि शासनाच्या महसूलात प्रचंड वाढ होईल व पदोन्नतीकरिता वारंवार होणारा शासनाचा वेळ व खर्च सत्कारणी लागणे, याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभागातील (गट-ब) या पदाच्या १९९८ च्या तुकडीतील मुंबई कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या १० वर्ष बदली न होण्यामागे व पदोन्नती न घेणाच्या मागे राजकीय वरदहस्त असल्याचा संशय, संबधित अधिकाऱ्यांचे बदली न होणे व पदोन्नती न घेणे याच्या मागची कारणे याबाबत शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, प्रतिकिया व भूमिका."

---

## मा.मंत्री (राउशु) यांचे निवेदन

सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२ दि.२८/०४/२०१५ अन्वये, "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" अंमलात आले आहे. सदर नियम सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांसाठी लागू आहेत. सदरहू नियमांमध्ये दि.१५.०६.२०१७ च्या अधिसूचनेन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर नियमानुसार सरळसेवेतील व पदोन्नतीने गट-अ

व गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांना विभागीय संवर्ग वाटप व किमान सेवाचा कालावधी याबाबत तरतूद विहीत केली आहे. तसेच, उक्त नियमान्वये, नागपूर, अमरावती व औरंगाबाद महसूली विभागातील मंजूर पदसंख्येच्या ८० टक्के पदे प्राथम्याने भरणेबाबत निदेश दिलेले आहेत.

विभागातील निरीक्षक हे गट-ब संवर्गातील पद असून सदर पद दुय्यम निरीक्षक (गट-क) संवर्गातून १०० टक्के पदोन्नतीने भरण्यात येते. निरीक्षक पदास उक्त संवर्ग वाटप नियम लागू असून अधिकाऱ्यांना वाटप करण्यात आलेल्या संवर्गामध्ये पदस्थापना देण्यात येते. सद्य:स्थितीत नागपूर, अमरावती व औरंगाबाद या तीनही महसूली विभागामध्ये निरीक्षक संवर्गाच्या मंजूर पदसंख्येच्या ८० टक्के पदे भरलेली आहेत. उक्त संवर्ग वाटप नियमांबाबत निर्गमित केलेल्या अधिसूचनांस अनुसरून निरीक्षक संवर्गातील महसूली विभाग वाटप करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांस त्याच महसूली विभागामध्ये विहीत कालावधी (६ वर्षे) पूर्ण करणे आवश्यक आहे. तथापि, उक्त नियमातील नियम १२ अन्वये वैद्यकीय कारणास्तव व पती-पत्नी एकत्रिकरण या कारणास्तव वाटप केलेल्या संवर्गात किमान एक वर्ष सेवा पूर्ण केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना विभाग बदलून देण्यात येते.

निरीक्षक (गट-ब), राज्य उत्पादन शुल्क संवर्गातील एकूण ७ अधिकाऱ्यांना उप अधीक्षक (गट-ब), राज्य उत्पादन शुल्क या पदावर सन २०१६-१७ मध्ये पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यापैकी एकही निरीक्षकाने पदोन्नती नाकारलेली नाही. सन २०१७-१८ मध्ये एकूण ९ निरीक्षकांना उप अधीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. पदोन्नती देण्यात आलेल्या सर्व ९ निरीक्षकांनी पदोन्नती स्विकारलेली आहे. तथापि, सन २०१७-१८ मध्ये पदोन्नती देण्याच्या कार्यवाहीदरम्यान विचारक्षेत्रातील अर्हताप्राप्त २ निरीक्षकांनी त्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या कारणास्तव पदोन्नती नाकारली आहे. तसेच, सन २०१८-१९ मध्ये एकूण ४ निरीक्षकांना उप अधीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यापैकी एकही निरीक्षकाने पदोन्नती नाकारलेली नाही. यावरुन पदोन्नती नाकारण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते.

शासनाने अधिकारी/कर्मचारी यांच्या बदलीबाबत "महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५" लागू केला आहे. तसेच शासनाने दि. ०९.०४.२०१८ च्या शासन निर्णयान्वये समुपदेशनाद्वारे बदलीबाबतचे धोरण निश्चित केले आहे. समुपदेशन धोरणानुसार बदली करताना (१) कर्मचारी स्वत: अपंग, (२) असक्षम मुलांचे, आईवडील, बहीण भाऊ यांचे काळजीवाहक, (३) जे कर्मचारी स्वत: कॅन्सर, मूत्रपिंड रोपण किंवा डायलेसिस, ब्रेन ट्युमर, कोमा, मनोविकृतीने ग्रस्त, हदयरोग या आजाराने पिडीत, (४) ज्या महिला कर्मचारी विधवा / परितक्त्या आहेत, (५) पती-पत्नी एकत्रिकरणांतर्गत, (६) कॅन्सर, मूत्रपिंड रोपण किंवा डायलेसिस, ब्रेन ट्युमर, कोमा, मनोविकृतीने ग्रस्त, हदयरोग शस्त्रक्रीया या कारणामुळे कर्मचाऱ्यावर अवलंबून असणारे मुले, आईवडील, सासू सासरे (७) उपरोक्त अनु. क्र. १ ते ६ मध्ये अंतर्भूत न होणारे तसेच अवघड क्षेत्रात कार्यरत असणारे व बदलीस पात्र असणारे, बिगर अवघड क्षेत्रात कार्यरत असणारे व बदलीस पात्र असणारे यांचा विचार करुन व प्रशासनाची निकड यांचा विचार करुन बदल्या करण्याबाबत निदेश दिलेले आहेत. उक्त अधिनियम तसेच समुपदेशनाचे धोरण विचारात घेउन निरीक्षक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी विचारात घेऊन करण्यात येतात.

महसूलाच्या बाबतीमध्ये मागील ७ वर्षांचा आढावा घेतला असता महसुलामध्ये सरासरी ८ ते ९% वाढ दिसून येते. अधिकाऱ्यांचे अनुज्ञप्तीधारकांबरोबरचे हितसंबंध व त्यामुळे महसूलावर अनिष्ठ / प्रतिकूल परिणाम होणे, अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

**********

## सन २०२० चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.४४२४**

**गृह विभाग**

**मा. श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ४४२४:-**

"भुसावळ (जि. जळगाव) शहरात गेल्या १२ महिन्यात ११ खुन, ९ गोळीबाराच्या घटना, २० ते २२ गावठी कट्टे जप्त करण्यात येणे, कुर्हे (पानाचे) येथील एटीएम फोडून धाडसी चोरी करण्यात येणे, दिनांक २ सप्टेंबर २०१९ रोजी आयोजित शांतता समितीच्या बैठकीत पोलीसांचे गुन्हेगारांशी असलेल्या संबंधाबाबत स्थानिक आमदारांनी केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल वरीष्ठ पोलीसांकडून घेण्यात न येणे, २०१९ च्या मकर संक्रातीच्या दिवशी शहर व बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत ७ ते ८ धाडसी चोरीच्या घटना होणे, २५ मार्च रोजी शहरातील डी.एस.ग्राऊंडवर जय अशोक दुधानी याचा भरदिवसा खुन होणे, १० एप्रिल रोजी डॅनियल जॉर्ज या रेल्वे कर्मचार्याचा पिस्तूलातून गोळी झाडून खून होणे, १४ एप्रिल रोजी प्रीता ओंकार बांगर तरुणीवर चाकू हल्ला होणे, १५ एप्रिल रोजी सरला अशोक भांडारकर या वृध्द महिलेचा खुन शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत होणे, ६ ऑक्टोबर रोजी समता नगरमध्ये बेधुंद गोळीबार करुन भाजपाचे तत्कालीन नगरसेवक रविंद्र खरात व इतर ४ जणांसह ५ जणांची हत्या होणे, भुसावळ शहरात पोलीसांनी वेगवेगळा ठिकाणी केलेल्या १४ कार्यवाहीत २१ गावठी कट्टे हस्तगत करण्यात यश येणे, १० ऑक्टोबार २०१९ रोजी दिपनगर येथील ठेकेदार मुकेश तिवारी यांवर घरात घुसुन गोळीबार करण्यात येणे, अशाप्रकारे जळगांव जिल्हयातील भुसावळ शहरात कायदा व सुव्यवस्था अत्यंत असुरक्षित झाल्याने व पोलीसांचे गुंडावर नियंत्रण न राहिल्याने भुसावळ शहरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले प्रचंड चिंतेचे व असुरक्षिततेचे वातावरण, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

## मा. गृह मंत्री महोदयांचे निवेदन

सन २०१९ मध्ये ११ महिन्यात एकुण ७ खूनाचे गुन्हे दाखल झाले असून ५ घटनांमध्ये अग्निशस्त्रांचा वापर करण्यात आलेला आहे.

सन २०१९ मध्ये १८ गावठी कट्टे पकडण्यात आले असून १८ गुन्हे दाखल करण्यात आले असून २० आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

दि.२१/०७/२०१९ रोजी ते दि.२२.०७.१९ दरम्यान कुऱ्हा गावातील IDBI बँक, शाखा कुऱ्हा पानाचे येथे चोरी घडले प्रकरणी भुसावळ तालुका, पो.स्टे येथे गु.र.नं. १३३/२०१९, भा.दं.वि.स.कलम ४५७,३८०,४२७,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयात अज्ञात चोरटयांनी ATM मशिन मधील ६,४१,०००/- रु रोख चोरी करून ATM मशिन गॅस कटरने कापुन सुमारे एक लाख रुपयाचे नुकसान केले आहे. सदर ए.टी.एम. मशीन ठेवण्यात आलेल्या कॅबीन मधील सीसीटीव्ही कॅमे-याचे फुटेज डी. व्ही. आर. मधून काढुन पुणे येथे तपासणीकामी पाठविण्यात आले आहेत.

भुसावळ शहरात माहे जानेवारी २०१९ मध्ये दि.१५/०१/२०१९ रोजी ६९००/- रु. किंमतीचे तेलाचे डबे व रोख रक्कम चोरीस गेले प्रकरणी भुसावळ शहर, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४५/२०१९ भा.दं.वि.स.कलम ३८० प्रमाणे व २९१००/- रु. किंमतीचा माल चोरीस गेले प्रकरणी भुसावळ बाजारपेठ, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१४/२०१९ भा.दं.वि.स. कलम ३७९ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दि.२४/०३/२०१९ रोजी भुसावळ शहरात डी. एस. ग्राउंडजवळ नरेश अशोक दुधानी यांना मागील भांडणाचे कारणावरुन चाकु व गिटाराने जबर मारहाण करुन जिवे ठार मारले प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून

आरोपींना अटक करुन त्यांचे विरुध्द ठोस पुरावे हस्तगत करुन मा. न्यायालयात दोषारोप सादर करण्यात आले आहे.

दि ०८/०४/२०१९ रोजी डॅनियल जॉर्ज यांची पैशाच्या वादातून हत्या झाले प्रकरणी भुसावळ शहर, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८७/२०१९ भा.दं.वि.स. कलम ३०२,३४ सह आर्म अॅक्ट कलम ३/२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करुन आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

दि. १४.४.२०१९ रोजी हुडको कॉलनी, भुसावळ येथे एका आरोपीने एकतर्फी प्रेमातून तरुणीची हत्या केले प्रकरणी भुसावळ शहर, पो. स्टे. गु.र.नं. ८९/२०१९ भा.दं.वि.स.कलम ३०२ सह आर्म अॅक्ट कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपीतास अटक करुन मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

दि ११.०४.२०१९ रोजी मयत सरला अशोक भांडारकर यांची हत्या झाले प्रकरणी भुसावळ शहर, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.९०/२०१९ भा.दं.वि.स. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी विरुद्ध मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले आहे.

दि.०६/१०/२०१९ रोजी लालचर्च जवळ व समता नगर परिसरात रविंद्र खरात व इतर ४ जणांना जिवे ठार करुन तीन जणांना ठार मारण्याचा प्रयत्न केले प्रकरणी दि.०७/१०/२०१९ रोजी भुसावळ शहर, पो.स्टे. गु.र.नं. २२२/२०१९ भा.दं.वि.स.कलम ३०२,३०४,३४ सह आर्म अॅक्ट कलम ३/२७, ४/२७ मु.पो.अॅक्ट १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात एकूण ५ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी हे सद्यःस्थितीत मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे न्यायालय कोठडीत आहेत. सदर गुन्हयाच्या तपासात भा.दं.वि.स. कलम १२० (ब), ३९७ तसेच अ.जा.ज.अ.प्रति का. कलम ३(२)(V) हे वाढीव कलम लावण्यात येवून दि.३१.१२.२०१९ रोजी मा. न्यायालयात दोषाराप पत्रा दाखल करण्यात आले आहे.

मुकेश तिवारी यांच्यावर घरात घुसून गोळीबार करण्यात येणे प्रकरणी दि.१०.१०.२०१९ रोजी भुसावळ तालुका, पो.स्टे येथे गु.र.नं. १५३/२०१९ भा.दं.वि.स. कलम ३०७,४५२ सह आर्म अॅक्ट कलम ३/२५ मु.पो.का.कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटकअ करण्यात आली आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

भुसावळ शहरात सन २०१९ मध्ये वेगवेगळ्या दिवशी अचानक नाकाबंदी लावून त्यात विविध कलमाखाली कारवाई करुन हिस्ट्रीशिटर, नॉन क्रिमिनल गुन्हेगार, नॉन बेलेबल वॉरंटातील गुन्हेगारांचा शोध घेवून त्यांना अटक करुन मा. न्यायालयात हजर करण्यात आले आहे. तसेच मालाविरुध्दचे गुन्हे घडू नये म्हणून व गुन्हेगारांवर वचक रहावा याकरीता वेळोवेळी कोंबींग ऑपरेशन राबविण्यात आले आहेत.

भुसावळ उपविभागीत निर्भया पथक तैनात करण्यात आले आहे. तसेच पोलीस स्टेशन हद्दीत बीट मार्शल व रात्र गस्त सक्त करण्यात आली असून वेळोवेळी अचानकपणे हद्दीत नाकाबंदी व कॉंबींग ऑपरेशन राबविण्यात येत असते. त्यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण नसून कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू दिलेला नाही व यापूढेही कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता ठेवली आहे.

*********

एच-१७२९-१३.

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

**श्री. मोहन मते, वि.स.स., यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापे येथील शाळेतील विद्यार्थ्यांना खासगी कंपनीमार्फत संगणक प्रशिक्षण देणा-या सानपाडा येथील वात्सल्य संस्थेच्या लोचन परूळेकर या शिक्षकाने ५० हून अधिक अल्पवयीन विद्यार्थिनींसोबत अश्लील वर्तन करून त्यांचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास उघडकीस आलेला असणे, या शाळेत खासगी कंपनीने आपल्या सीएसआर फंडातून संगणक प्रशिक्षण केंद्र उभारले असून गेल्या दोन महिन्यांपासून वात्सल्य ट्रस्ट नामक संस्थेने लोचन परूळेकर याची संगणक प्रशिक्षक म्हणून तिथे नियुक्ती केली असणे, या कालावधीमध्ये आरोपीने शाळेतील अनेक विद्यार्थिनींसोबत अश्लील वर्तन केले असणे, संगणकाचे शिक्षण देण्याच्या बहाण्याने आरोपी सहावी ते आठवीतील विद्यार्थिनींना शाळा सुटल्यावर अथवा सुट्टीच्या दिवशी शाळेत बोलवून त्यांच्याशी गैरवर्तन केल असणे, घाबरलेल्या विद्यार्थिनींनी प्रारंभी हा प्रकार कुणाला सांगितलेला नसणे, मात्र मुलींमध्ये याबाबत कुजबुज सुरू झाल्यानंतर शाळेतील शिक्षकांनी मुलींना विश्वासात घेऊन त्यांच्याकडून माहिती काढून घेत हा प्रकार मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आणल्यानंतर महिला तक्रार निवारण समितीने खातरजमा केल्यानंतर मुख्याध्यापकांनी याबाबतचा अहवाल १४ फेब्रुवारी रोजी शिक्षण विभागास सादर केला असणे, शिक्षण विभागाचे उपायुक्त, शिक्षणाधिकारी यांनी वात्सल्य ट्रस्टला तातडीने नोटीस बजावून संबंधित संगणक शिक्षकाला तात्काळ कामावरून काढून टाकण्याचे व त्याच्याविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे दिलेले आदेश, त्यानुसार वात्सल्य ट्रस्टने आरोपी विरोधात तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार केलेली असणे, अशा दुष्कृत्यांना आळा घालण्यासाठी सदर प्रकरणातील आरोपीस तात्काळ कठोर शिक्षा मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि प्रतिक्रिया. "

.......................................................................................................

### मा. मंत्री (गृह) महोदय यांचे निवेदन

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापे येथील शाळेतील विद्यार्थ्यांना खाजगी कंपनीमार्फत संगणक प्रशिक्षण देणा-या सानपाडा येथील वात्सल्य संस्थेच्या शिक्षकाने संगणक विषयाच्या तासांच्या दरम्यान इयत्ता दुसरी ते आठवी मध्ये शिकणा-या विद्यार्थिनी तसेच एक मतिमंद विद्यार्थिनी यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्याच्या फिर्यादीवरून तुर्भे पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५७/२०२० भादवि ३५४ सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ९ (एफ) (के) (एल) (एम), १० प्रमाणे दिनांक २५/०२/२०२० रोजी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील आरोपीस त्याच दिवशी अटक करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापे येथील शाळेमध्ये सीएआर फंडातून संगणक प्रशिक्षण केंद्र उभारले असून नोव्हेंबर २०१९ पासून वात्सल्य ट्रस्ट या संस्थेने आरोपी शिक्षक याची संगणक प्रशिक्षक म्हणून तिथे नियुक्ती केली. तसेच आरोपी शिक्षकाने एकूण २९ अल्पवयीन विद्यार्थिनी सोबत अश्लील वर्तन करून त्यांचा विनयभंग केल्याचे सदर गुन्ह्याच्या तपासात निष्पन्न झाले आहे. शिक्षण विभागाचे उपायुक्त यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे वात्सल्य ट्रस्ट ने संगणक शिक्षक असलेल्या आरोपीस तात्काळ कामावरून काढुन टाकले असून सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

शेटा म/1753-1 (750-9-2020) कृ.मा.प.

.......................................................................................................

**राज्यातील महिला व बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना आहे :-**

- महिलांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी , महिला अत्याचार प्रतिबंधक विभागाची स्थापना करण्यात आली असून विशेष पोलीस महानिरीक्षक हे विभागाचे प्रमुख आहेत.
- महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याकरीता राज्यात २७ विशेष न्यायालये व २५ जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.
- पोलीस आयुक्तालये/जिल्हयांमध्ये महिला सुरक्षा समित्या व महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.
- बलात्कारासारख्या गंभीर गुन्हयांचा तपासाची कार्यपध्दती बाबतच्या मार्गदर्शक सुचना सर्व पोलीस घटकांना वितरीत केलेल्या आहेत.
- छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पायी पेट्रोलिंग,शाळा कॉलेजच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना,नाकाबंदी, महिला सुरक्षा व छेडछाड पथके तयार करण्यात आली आहेत.
- महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तपासासाठी आणि त्यांचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरावर दि.१२/१०/२०१७ च्य शासन निर्णयानुसार विशेष पथके गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे.
- राज्यात,मुंबईसह पुणे शहर, ठाणे शहर, नागपूर शहर, पुणे ग्रामिण, यवतमाळ, अहमदनगर येथे Investigation Units for Crime Against Women (IUCAW) स्थापन केली आहेत.
- समस्याग्रस्त महिलांचे समुपदेशन करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कक्ष स्थापन करण्यात आली आहेत.मा. धर्माधिकारी समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार रेल्वेस्टेशन परिसर व एस.टी. स्टँन्ड येथे एकुण ३६४ ठिकाणी महिला मदत केंन्द्रे सुरु करण्यात आली आहेत.
- मुंबई, ठाणे व नवी मुंबई क्षेत्रातील संकटातील महिलांच्या मदतीकरिता टोल फ्रि हेल्पलाईन क्र. "१०३" व उर्वरित क्षेत्राकरिता "१०९१" सुरु करण्यात आली आहे. रेल्वे पोलीस घटक, मुंबई व पुणे ९८३३३३११११ , नागपुर ०७१२-२७४३९८४ व बहन्मुबई पोलीस घटकात २४ तास कार्यरत असणारी हेल्पलाईन सेवा कार्यरत आहे. याशिवाय www.mumbaipolice.org व comcell.mum.crime@mahapolice.gov.in या वेबसाईटवर online तक्रार करता येते.
- संकटग्रस्त महिला व मुलींच्या सुरक्षिततेकरिता (अकोला, बीड, उस्मानाबाद, परभणी, नागपूर ग्रामीण, वर्धा, अहमदनगर, रत्नागिरी, ठाणे ग्रामिण, नागपूर शहर, ठाणे शहर, औरंगाबाद शहर, सोलापूर शहर, नवी मुंबई व अमरावती शहर) नमूद घटकांनी मोबाईल ॲप सुरु करण्यात आले आहे.
- महिलांवरील बलात्कार, विनयभंग, छेडछाड, ॲसिड हल्ला या अत्याचाराच्या गुन्हयामधील आरोपींना जास्तीत जास्त शिक्ष होण्याच्या दृष्टीने प्रचलित कायदयात सुधारणा करुन शासनाने फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१३ (२०१३ चा अधिनियम क्र.१३ पारित केला आहे.)
- Criminal Law Amendment No.२ of २०१८ नुसार बलात्कारांच्या गुन्ह्यांच्या शिक्षेत केलेली वाढ व तपासाबाबतच्या नवीन सुधारणांबाबतच्या सूचना दि.०९/०७/२०१८ रोजीच्या परीपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या आहेत.
- हरविलेले व संकटातील बालकांसंदर्भात आदर्श कार्यप्रणाली (SOP) पोलीस घटकांना वितरीत केली आहे. www.trackthemissingchild.gov.in या संकेतस्थळाबरोबर १०९८ ही टोल फ्री हेल्पलाईन कार्यान्वीत करण्यात आली आहे.

............................................................................................

H/1753-1A

श्री. सुरेश भोळे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना क्र. ३५ पुढीलप्रमाणे आहे. :-

"जळगांव शहरातील मतदारांची लोकसंख्या पाच लाखाहून अधिक असणे त्यामुळे जळगांव तहसिल कार्यालयात प्रचंड प्रमाणात गर्दी होत असणे व हे कार्यालय जळगांव शहर व जळगांव तालुका मिळून एकच असणे, यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागणे, तेथील जागा कमी पडणे, तसेच तहसील कार्यालयाची इमारत जुनी झाली असून तेथे काही प्रमाणात दुरूस्ती करावयाची असून इमारत खुप प्रमाणात जीर्ण झाली असून तेथील इमारत नवीन बांधण्यात यावी व परंतू कर्मचारी कमी असल्याने नागरीकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, या सर्व बाबी लक्षात घेता कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात येण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना, व प्रतिक्रिया"

---

## मा.मंत्री (महसूल) श्री. बाळासाहेब थोरात यांचे निवेदन

जळगाव शहराचा मोठया प्रमाणात विस्तार होत असल्यामुळे तसेच जळगाव तहसिल कार्यालयाची इमारत जुनी झाली असल्यामुळे सदर कार्यालयासाठी नवीन इमारत बांधकाम करण्याकरिता जळगाव शहर येथील सिटी सर्व्हे नं. १९७५ मधील एकूण क्षेत्र १६७७४४.२ चौ.मी. या जागेपैकी ५००० चौ.मी जागा वर्ग करण्यात आलेली आहे. सदर जागेवर तहसिल कार्यालयाचे सर्व सुविधांनी युक्त इमारत बांधण्यासाठी इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व नकाशे तयार करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास जिल्हाधिकारी जळगाव यांनी निर्देश दिलेले आहेत. सदर बांधकामाचे अंदाजपत्रक व नकाशे शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यास निधी उपलब्ध्तेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याचे संकल्पित आहे.

तहसिल कार्यालय जळगाव मध्ये ९२ मंजूर पदे असून कार्यरत पदे ७८ आहेत. कर्मचारी कमी असल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाले असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

**********

रोटा H/1748-1 (500-9-2020)

(५४)

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना.

**लक्षवेधी सूचना**

डॉ. बालाजी किणीकर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे:-

"इलेक्ट्रोपॅथी / इलेक्ट्रोहोमेओपॅथी हे चिकीत्सा शास्त्र संपूर्ण भारत देशात प्रमोशन, डेव्हलपमेंट व रिसर्च या तत्वावर कार्यरत असणे, महाराष्ट्र राज्यात सन १९८५ पासून हे शास्त्र मोठ्या प्रमाणात कार्यरत असल्याने राज्यातील मध्यमवर्गीय व गरीब शेतकरी कुटुंबातील इलेक्ट्रोपॅथी / इलेक्ट्रोहोमेओपॅथी या चिकीत्सा शास्त्राचे शिक्षण घेतलेले किमान ३० हजार व्यावसायिक आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह या चिकीत्सा पध्दतीवर चालवीत असून देशाच्या मा. सर्वोच्च न्यायालयाने व मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने या चिकीत्सा शास्त्रान्वये व्यवसाय करण्याची परवानगी दिलेली असणे, तसेच महाराष्ट्र राज्य बाहेरील राजस्थान शासनाने या चिकित्सा पध्दतीस मान्यता दिलेली असल्याने त्याच धरतीवर महाराष्ट्र शासनाने या चिकित्सा पध्दतीस मान्यता दिल्यास राज्यातील ३० हजार व्यावसायिकांना त्याचा फायदा होऊ शकेल, तरी या प्रकरणी शासनाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता,"

---

**मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन पुढीलप्रमाणे**

केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने दि.२५.११.२००३ रोजीच्या आदेशाद्वारे मान्यताप्राप्त आयुर्वेद, सिध्द, युनानी, होमिओपॅथी आणि योग तसेच निसर्गोपचार या व्यतिरिक्त अन्य पॅथींना मान्यता दिलेली नाही.

मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.५५२६/१९९५ व इतर याचिकामध्ये दि.२२.१०.२००६ च्या आदेशाव्दारे , " इलेक्ट्रोपॅथी / होमिओ इलेक्ट्रोपॅथीचा व्यवसाय करणारे व्यवसायी आपल्या नावासमोर डॉक्टर अथवा तत्सम (हकीम, वैद्य इ.) पदनाम लावून व्यवसाय करीत असल्यास त्यांची सदर कृती महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९६१ मधील तरतूदीनुसार कार्यवाहीस पात्र ठरतील" असे स्पष्ट केलेले आहे. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या अपीलांवर मा. उच्च न्यायालयाचे उक्त आदेश कायम ठेवण्यात आले असून यापुढे अशा गैर व्यवसायिकांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहे.

मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाचे उक्त आदेश विचारात घेऊन, शासनाने दिनांक १८.११.२०१० च्या पत्रांन्वये, " इलेक्ट्रोपॅथी / होमिओ इलेक्ट्रोपॅथीमध्ये डॉक्टर व तत्संम पदनाम लावून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांविरुध्द बोगस डॉक्टर म्हणून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा," असे सर्व पोलिस आयुक्त व जिल्हा पोलिस अधिक्षक यांना कळविण्यात आले आहे.

Rota/H1706 [750-7-2020]-1

P.T.O.

तसेच मा. उच्च न्यायालयाच्या उक्त पिटीशन मधील दि.२२.१२.२००६ रोजीच्या न्यायनिर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे आणि मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांच्या रिट पिटीशन क्र.१०६३/२००६ मधील दि.१७.०७.२००७ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार इलेक्ट्रोपॅथी किंवा इलेक्ट्रोहोमिओपॅथी मधील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदवीका धारण करणाऱ्या याचिकाकर्त्यांना महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अंतर्गत नोंदणीशिवाय, खालील अटींच्या अधीन इलेक्ट्रोपॅथी किंवा इलेक्ट्रोथेरपीचा व्यवसाय करण्यास दि.२५.०६.२०१४ व दि.२२.०१.२०१८ च्या पत्रांन्वये मान्यता दिली आहे व तसे सर्व जिल्हाधिकारी/पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक यांना कळविण्यात आले आहेत.

१. सदर व्यक्ती हे वैद्यकीय व्यवसायी म्हणून मानण्यात येणार नाहीत किंवा त्यांना वैद्यक व्यवसायी असल्याचा दावा करता येणार नाही.

२. सदर व्यक्ती आपल्या नावपुढे वा नंतर “डॉक्टर” किंवा तत्सम पदवी लावू शकणार नाहीत.

३. सदर व्यक्ती त्यांच्या रुग्णालयाच्या/दवाखान्याच्या बोर्डावर अथवा त्यांच्या लेटरहेडवर स्वत:च्या नावामागे वा पुढे “डॉक्टर”,”वैद्य”,”हकीम” किंवा तत्सम संबोधन लावू शकरणार नाहीत.

४. सदर व्यक्ती ही फक्त इलेक्ट्रोपॅथी किंवा इलेक्ट्रोथेरपीचीच औषधे रुग्णाला देऊ शकतील व इतर कोणत्याही चिकित्सा पध्दतीची औषधे रुग्णांना देता येणार नाही.

५. सदर व्यक्ती ही फक्त इलेक्ट्रोपॅथी किंवा इलेक्ट्रोथेरीपीचीच औषधे रुग्णांना लिहून देऊ शकतील व त्या पध्दतीच्या औषधांचा साठा ठेवू शकतील. इतर कोणत्याही चिकित्सा पध्दतीची औषधे रुग्णांना लिहून देऊ शकणार नाही व त्यांच्या औषधांचा साठा ठेवू शकणार नाही.

केंद्र शासनाचे आयुष मंत्रालयाने, ज्या चिकित्सा पध्दतींना कायदेशीर पार्श्वभूमी/मान्यता नाही, अशा अल्टरनेटिव्ह / नवीन चिकित्सापध्दतींचे परिक्षण / पडताळणी करुन त्यांचेसाठी विनियमन तयार करुन शिफारस करण्यासाठी "इंटर डिपार्टमेंटल कमिटी" स्थापन केली आहे . सदर समितीचा अंतिम निर्णय अद्याप अप्राप्त आहे.

तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये कार्यरत इलेक्ट्रो-होमिओपॅथी चिकित्सकांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ.श्रीराम सावरीकर यांचे अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची समिती दि.१९.०६.२०१९ अन्वये गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या दि.१३.९.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये, “इलेक्ट्रोहोमिओपॅथी चिकित्सा पध्दतीस मान्यता देणेबाबतची पुढील कार्यवाही केंद्र शासनाचे स्तरावरील नियुक्त उक्त समितीकडून करण्यात येईल, असा निर्णय राज्याच्या समितीने घेतला आहे. यानुषंगाने उक्त समितीच्या अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर याबाबत योग्य कार्यवाही करण्यात येईल.

..........................................................................

H1706-1a

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा)पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. अतुल भातखळकर, संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. राम कदम, अभिमन्यु पवार, कालीदास कोळंबकर, प्रमोद पाटील विधानसभा सदस्य यांनी दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"जामसूद (ता. गुहागर, जि. रत्नागिरी) येथील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी घरातून जळाऊ लाकडे आणण्याची सक्ती करण्यात येत असणे, सदर प्रकार मागील बऱ्याच दिवसांपासून सातत्याने सुरु असणे, सदर शाळेतील विद्यार्थी पाठीवर दप्तर व डोक्यावर लाकडाची मोळी घेवून शाळेत जातानाचा दिनांक ०४ व ०५ फेब्रुवारी, २०२० रोजीचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने गुहागरच्या शिक्षण क्षेत्रात उडालेली खळबळ, एकीकडे मुलांच्या शाळेतील गळतीचे प्रमाण थांबावे व त्यांना शाळेची आवड निर्माण व्हावी या हेतूने सरकारच्या शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्रत्येक शाळेत मुलांना मोफत आहार दिला जात असणे, तसेच या योजनेसाठी लागणारा इंधन खर्चही शाळेला दिला जात असणे, असे असतानाही जामसूद येथील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार शिजविण्यासाठी लागणारी लाकडे आणण्याची सक्ती विद्यार्थ्यांवर करण्यात येत असणे, शाळेत येताना लाकडे आणली नाहीत तर मार बसेल असा दम शिक्षकांनी दिल्याचे निदर्शनास येणे, तसेच केंद्र सरकार उज्वल गॅस योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भाग धूरमुक्त करुन महिलांना दिलासा देत असताना शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना डोक्यावरुन लाकडाची मोळी नेण्याचा प्रसंग यावा ही दुर्देवाची बाब ठरली असल्याची संतापजनक प्रतिक्रिया संपूर्ण गुहागर तालुक्यात उमटलेली असणे, यामुळे या संपूर्ण प्रकरणाची विनाविलंब सखोल चौकशी करुन संबंधित दोषींविरोधात ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया."

## निवेदन

### (प्रा. वर्षा गायकवाड, शालेय शिक्षण मंत्री)

शालेय पोषण आहार योजनेची ग्रामीण भागात अंमलबजावणी शालेय व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात येते. शालेय व्यवस्थापन समितीमार्फत संबंधित शाळेत अन्न शिजवून देण्यासाठी बचत गट/स्थानिक महिला यांची नियुक्ती करण्यात येते. सदर बचत गट/महिला यांना आहार शिजवून देण्यासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी या प्रमाणे इंधन व भाजीपाला यासाठी शासनामार्फत नियमितपणे अनुदान देण्यात येते. जिल्हा परिषद शाळा जामसूद नं.१ शाळेमध्ये इ. १ ली ते ४ थी या वर्गात एकूण ३५

विद्यार्थी शिकत आहेत. सदर शाळेस माहे एप्रिल, २०१७ मध्ये शालेय पोषण आहार योजनेतंर्गत गॅस कनेक्शन व शेगडी खरेदी करिता रु.७१५०/- इतके अनुदान देण्यात आले होते. त्यामधून सदर शाळेने गॅस कनेक्शन व शेगडी खरेदी केली आहे. तथापि, गॅस सिलेंडर वितरण वेळेत होत नसल्याने प्रस्तुत शाळेत शालेय पोषण आहार चूलीवर शिजवून देण्यात येत आहे.

जामसूद नं.१ या शाळेमध्ये आहार शिजवण्यासाठी लागणारी जळावू लाकडे भिजलेली असल्याने पालकांनी इंधनासाठी आवश्यक लाकडे स्वत: देण्याबाबत इच्छूकता दर्शविली. त्यानुसार सदर विषय शाळा व्यवस्थापन समितीच्या दि. १६/०८/२०१९ रोजीच्या बैठकीत ठरावाद्वारे मंजूर केला. त्यानुषंगाने पालकांनीच मुलांकडून लाकडे पाठविली होती. यासंदर्भांत शिक्षकांनी कोणतीही सक्ती विद्यार्थ्यांवर केलेली नाही. याबाबत पालक, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समिती यांच्याकडून कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

राज्यात सद्यस्थितीत शालेय पोषण आहार योजनेसाठी पात्र असलेल्या एकूण ८६,१५८ शाळांपैकी ४४,४१४ इतक्या शाळांमध्ये गॅस कनेक्शन उपलब्ध आहे. उर्वरित शाळांमध्ये गॅस कनेक्शन जोडण्यासाठी अनुदान देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. राज्यातील शाळांना इंधन व भाजीपाला यासाठीचे अनुदान थेट प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरून अदा करण्यात येते. सद्यस्थितीत माहे जानेवारी, २०२० अखेरचे सदर अनुदान शाळांना अदा करण्यात आले आहे.

**********

H-1655-13J.

६८

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**सर्वश्री.अमित झनक, अमीन पटेल, श्रीमती गीता जैन, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-**

"ठाणे जिल्हयातील मीरारोड येथील कनकीया भागातील नाविकास क्षेत्र, सीआरझेड, भरतीची उच्चतम रेषा, कांदळवनने बाधित असलेल्या जागेत पर्यावरणाचा ऱ्हास करुन बेकायदेशीर भराव करुन सेव्हन इलेव्हन क्लब उभारण्यात आले असल्याने अलिकडेच निदर्शनास येणे. सदरहू क्लबसाठी ३० ते ४५ मिटर हाय-वे असल्याचे दाखवून पर्यटन विकासासाठी जादा चटईक्षेत्र देण्यात येणे, या अनधिकृत क्लबच्या बांधकामामुळे कांदळवन नष्ट होत असल्याबाबत अनेक तक्रार जनतेकडून व लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाला देण्यात आल्या असतानाही अदयाप याप्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात न येणे, पर्यटन विकासाबाबतच्या शासनाचे नियम गृहीत धरुन चुकीच्या आधारे शासनाने सेव्हन इलेव्हन क्लबला नियमांचे उल्लंघन करुन जादा एफ.एस.आय देण्यात आल्याने या क्लबचे बांधकाम निष्कासित करुन सीआरझेडची जागा मोकळी करण्यासाठी कारवाई करण्यात येत नसल्यामुळे निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने त्वरीत सखोल चौकशी करुन सदरील क्लबचे बांधकाम निष्कासित करुन सीआरझेडची व ना विकास क्षेत्राची जागा मोकळी करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया "

## मा.मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

मे.सेव्हन इलेव्हन हॉटेल्स प्रा.लि. यांनी मौजे नवघर, स.क्र.२६५/४, २६६/२, ३,५,६, २६७/३ (जुना); ८१/४,६७/२,३,५,६, ६७/३ (नविन) या मंजूर रेखांकनात मौजे नवघर, स.क्र.२६५/२, २६६/१,४, व २६७/२ (जुना); ८१/२, ६७/१,४, व ५२/२ (नविन) या जागा समाविष्ट करुन एकत्रित जागेत बांधकाम परवानगी मिळण्याचा प्रस्ताव सादर केल्यानंतर मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि.१९/११/२०१५ रोजी बांधकाम परवानगी दिली असून, सुधारीत बांधकाम परवानगी दि.१८/०२/२०१७ रोजी दिली आहे. कांदळवन क्षेत्रात भराव केल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द मिरा रोड पोलीस स्टेशन येथे महसुल विभागाच्या अधिकाऱ्यांनी एफ.आय.आर.दाखल केले आहे. तसेच सदर बाबतीत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल आहे.

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.५७(xiii)(ड) नुसार ३० ते ४५ मीटर रुंद रस्त्यावर ३०.०० मीटर खोलीपर्यंत ना-विकास क्षेत्रात रहिवासी वापर अनुज्ञेय आहे. मे.सेव्हन इलेव्हन हॉटेल्स प्रा.लि.यांनी उक्त तरतुदीनुसार सदर जागेवर हॉटेलचे बांधकाम अनुज्ञेय करण्याची विनंती केली होती. विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.५१(७)(vii) मधील तरतूदीनुसार रहिवास वापर विभागात हॉटेल बांधकाम अनुज्ञेय आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना अर्जदाराचा प्रस्ताव मान्य करण्यात येत असल्याचे शासनाने कळविले आहे. सदरहू क्लबसाठी ३० ते ४५ मीटर हायवे असल्याचे दाखवून अथवा पर्यटन विकासासाठी जादा चटईक्षेत्रास शासनाने मंजूरी दिलेली नाही.

सदर क्लबच्या बांधकामाबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या असून, सदर तक्रार अर्जावर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना शासनाने कळविले आहे. तसेच दि.०६/०१/२०२० च्या पत्रान्वये प्रकरणातील सदय:स्थितीची सविस्तर माहिती मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून मागविण्यात आली आहे.

शासनाने सेव्हन इलेव्हन क्लबला अर्जदाराच्या प्रस्तावानुसार मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार मान्यता दिलेली असून नियमाचे उल्लंघन करुन ज्यादा एफ.एस.आय.देण्यात आलेला नाही. तसेच प्रश्नांकित जागेबाबत महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या फेरबदल प्रस्तावावर शासनाने दि.०६.०१.२०२० च्या पत्राने प्रकरणातील सदय:स्थितीची सविस्तर माहिती मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून मागविली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्याची शासनाची भुमिका आहे.

********

रोटा/एव-१७१७[७००-०८-२०२०].

# महाराष्ट्र विधान सभा

## सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक ९५**

श्री सहसराम कोरोटे, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ९५ पुढीलप्रमाणे आहे:-

"पूर्व विदर्भात गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात शेतक-यांचा भातशेती हा प्रमुख व्यवसाय असणे, गोंदिया जिल्ह्यात आमगांव देवरी मतदारसंघात दिनांक २६, २८ नोव्हेंबर, व दिनांक २, ५, ६ आणि १९ डिसेंबर, २०१९ रोजी शेतक-यांच्या धानांच्या पुंजणाला नऊ गावातील हेतूपुरस्कर आग लागून धान उत्पादकांना ६१,०९,६०६/- एवढी नुकसान होणे, यावर त्यांची उपजिविका असणे, गोंदिया जिल्ह्यात आमगांव, देवरी हा आदिवासी आर्थिकदृष्ट्या मागासलेला मतदारसंघ असून आदिवासी लोकांचा भात शेती हा प्रमुख व्यवसाय असणे, पुंजणाला आग लागण्याने शेतकरी हवालदिल झाले असणे, त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे, त्यामुळे शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या, तसेच पुंजनाला आग लावणा-यांना अद्याप अटक न करणे, अथवा कोणतीही कारवाई न होणे, दोषी मोकाट फिरत असणे, शासनाच्या या दुर्लक्षामुळे व शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत होत असलेल्या विलंबामुळे त्यांच्यामध्ये निर्माण झालेला असंतोष व चिडीची भावना, शासनाने तातडीने या शेतक-यांना मदत मिळणेबाबत तसेच दोषींवर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

## <u>मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन</u>

भंडारा जिल्ह्यात-६, गोंदिया जिल्ह्यात-६, चंद्रपूर जिल्ह्यात-४ आणि गडचिरोली जिल्ह्यात-१० या प्रमाणे धानाचे पुंजने जळाल्याबाबतचे अर्ज संबंधित जिल्ह्याधिकारी यांच्याकडे प्राप्त झाले आहेत. धानाचे पुंजने, धानाचे ढिगारे किंवा डीबली यांना आकस्मिक आग लागून नष्ट झाल्यास सानुग्रह मदत देण्याची तरतुद राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF) मध्ये नाही. तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी देवरी येथील शेतक-यांना प्रत्येकी रूपये २०,०००/- प्रमाणे मदत वाटप केलेली आहे. त्याचप्रमाणे आमगांव येथील बाधित शेतक-यांना मदतीचे वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडे तहसिलदारांकडून पाठविण्यात आला आहे. धानाचे पुंजने जळाल्याने बाधित शेतक-यांनी आत्महत्या केल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

************

रोटेट/एच १६१८ [३०-७-२०२०].

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२० चे द्वितीयअधिवेशन (अर्थसंकल्प)

मा. श्री. सुनिल प्रभू विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४९९० पुढीलप्रमाणे आहे -:

"मुंबईतील भायखळा पूर्व येथील सर ज.जी. समुह रुग्णालय व कामा रुग्णालयात गेली २० वर्षापासून ६ अंशकालीन महिला कर्मचारी यांचेसह ग्रँड शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वर्ग-१ ते वर्ग ४ या संवर्गातील १३१ रिक्त पदे भरण्याची शासनाने २ वर्षापूर्वी जाहीर करुनही अद्याप शासनातर्फे रिक्त पदे भरण्यात आली नसल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, वित्त व सामान्य प्रशासनाच्या मान्यतेसाठी गेली २ वर्षापासून संबंधित प्रश्न प्रलंबित असणे, गेली २० वर्षापासून ४१८ रुपये इतक्या अल्प वेतनावर काम करणाऱ्या ६ महिला कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणेबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी शासनास पत्राद्वारे शिफारस करुनही त्याची शासनाकडून दखल घेण्यात न येणे, सद्यस्थितीत सदरहू महिलांचे वय नियमबाहय असल्याने त्यांना अन्यत्र कोठेही नोकरी मिळत नसणे, २० वर्षे रुग्णालयात सेवा देऊनही त्यांना सेवेत कायम न करता शासनाकडून त्यांच्यावर झालेला अन्याय माहे एप्रिल २०१६ रोजी शासनाने सदरहू ज.जी. रुग्णालयातील ७७४ बदली कामगारांना सेवेत कायम करणे त्याच धर्तीवर सदरहू ६ अंशकालीन माहिलांना सेवेत कायम करुन महाविद्यालयातील वर्ग-१ ते वर्ग ४ मधील १३१ रिक्त पदे तातडीने भरणेबाबत निर्णय घेऊन शासनाने रुग्णांना सुरळीत आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, परिणामी सर ज.जी. रुग्णालयातील अन्यायग्रस्त कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया"

### मा.श्री.अमित देशमुख, मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे निवेदन

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई व सेंट जॉर्ज रुग्णालय, मुंबई या दोन्ही संस्थेत एकुण ६ अंशकालीन लिपीक सन १९९७ ते २००० या कालावधीपासून कार्यरत आहेत. त्यांच्या सेवा नियमित करण्याकरीता कौशल्य विकास व उद्योजकता विभाग व सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. "सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य" या योजनेतून शासनाच्या विविध कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात काही तासांकरीता काम करुन मानधन देण्यात येत असलेल्या योजनेतून पदवीधर अंशकालीन या घटकाची निर्मिती झाली आहे. काही कालावधीनंतर सदर योजनेची फलनिष्पती न झाल्याने दि.११.२.२००४ रोजीच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेत सुधारणा करुन त्याऐवजी "सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवासोसायटयांना आर्थिक सहाय्य" अशी योजना सुरु करण्यात आली. या योजनेमध्ये ज्या पदवीधर उमेदवारांनी ३ वर्षे काम केले आहे अशा उमेदवारांच्या अनुभवाची नोंद सेवायोजन

शेटा H/1755-1 (750-9-2020)

[कृ.प.उ.

कार्यालयात ठेवण्यात येत होती. ३ वर्षाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना विहीत मार्गाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी शासनाने १० टक्के समांतर आरक्षण लागू केले असून या पदावर सरळसेवेने शासन सेवेत येण्यासाठी कमाल वयोमर्यादेत ४६ वर्षापर्यंत शिथीलता देण्यात आली आहे. अशा अंशकालीन उमेदवारांना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याचे कोणतेही धोरण नाही.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थेतील ६ कर्मचारी हे ३ वर्षे अनुभव प्रमाणपत्र धारण करीत असल्याची नोंद सेवायोजन कार्यालयाकडे नसल्याने ते पदवीधर अंशकालीन उमेदवार नसल्याचे अभिप्राय कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने दिलेले आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागाने सुध्दा या ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा शासन परिपत्रक दि. २५.८.२००५ मधील मार्गदर्शक सुचना विचारात घेता, नियमित करता येणार नाहीत असे स्पष्ट अभिप्राय दिलेले आहेत. या सर्व कारणांमुळे या ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करता येणार नाहीत.

ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई या संस्थेत गट-अ ते गट -ड या संवर्गातील एकुण ७६४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६१५ पदे भरलेली असून उर्वरीत १४९ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांपैकी अध्यापकीय पदे निवडमंडळामार्फत तसेच पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांच्या ७५ टक्के तसेच पदोन्नतीच्या कोटयातील केवळ खुला प्रवर्गातील पदे भरता येत असल्याने पदे रिक्त राहतात. गट-क तांत्रिक संवर्गातील १७ पदांच्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्याची कार्यवाही चालू असून उर्वरीत गट-क ची पदे भरण्यासाठी सामायिक लेखी परीक्षा आयोजित करण्याची कार्यवाही संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्यामार्फत करण्यात येत आहे. गट-ड ची पदे बाहयस्त्रोतामार्फत भरण्याचे धोरण असल्याने सदर पदे सरळसेवेने भरता येत नाही. तथापि गट-ड संवर्गातील वारसाहक्काची व अनुकंपा तत्त्वावरील पदे भरण्यात येत आहेत.

**********

H/1755-19

लक्षवेधी सूचना क्रमांक १०९

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**मा.सर्वश्री सुनिल प्रभू, सुनिल भुसारा, अतुल बेनके, संदिप क्षिरसागर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १०९ पुढीलप्रमाणे आहे :**

"वाल्हिवरे (ता.मुरबाड, जि.ठाणे) लोकसेवा शिक्षण संस्थेच्या आश्रम शाळेत अध्यक्षांनी विद्यार्थ्यांना वितरण करावयाच्या साबण, तेल, केस कटींग अन्य वस्तुंसाठी आलेला निधी बोगस बिले सादर करुन मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करुन भ्रष्टाचार केल्याचे प्रकरण आश्रम शाळेचे चिटणीस व कोशाध्यक्षांनी दिनांक ११.०२.२०२० रोजी उघडकीस आणणे, वाल्हिवरे आश्रम शाळेतील मुलांना देण्यात येणाऱ्या वस्तुमध्ये कपात करुन व खोटी बिले बनविण्यात येऊन निधी हडप करण्याचा प्रकार घडणे, यासंदर्भात शासनाने नेमलेल्या द्विसदस्यीय चौकशी समितीने आश्रम शाळेस भेट देऊन याबाबतचा चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात येणे, सदर प्रकरणी संस्थेला चौकशी अहवाल सादर करण्यासाठी अधिकारी गेले असता बाळकृष्ण पवार व अन्य साथीदारांनी सदर प्रकरण आपसात मिटवा अन्यथा जीवानिशी जाण्याची धमकी देण्यात आल्याची टोकावडे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यांत येणे, आश्रम शाळेच्या अध्यक्षांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द गुन्हे दाखल करुन कारवाई करणेबाबत अद्यापही टोकावडे पोलीस ठाणे अधिकारी यांनी कोणतीच कार्यवाही न करता प्रकरण आर्थिक संगनमताने दडपून टाकल्याचा आश्चर्यजनक प्रकार घडणे, यामुळे सदरहू आश्रम शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यावश्यक व जीवनावश्यक वस्तुंच्या वापरापासून वंचित रहावे लागणे, यामुळे सदरहू विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय विचारात घेता सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**ॲड.के.सी.पाडवी, मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन.**

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यामध्ये एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळा मंजुर असून त्यापैकी ५३८ आश्रमशाळा कार्यरत आहेत. अनुदानित आश्रमशाळांमध्ये एकूण २,३३,४९३ इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे विभागात ६ प्रकल्प कार्यालयांतर्गत एकूण ७१ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. त्यापैकी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर, जि.ठाणे एकूण १३ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून त्यामध्ये लोकसेवा शिक्षण संस्था, खेवारे, ता.मुरबाड, जि.ठाणे द्वारा संचलित अनुदानित आश्रमशाळा वाल्हिवरे, ता.मुरबाड, जि.ठाणे ही शाळा कार्यरत असून सदर आश्रमशाळेत सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात १६२ मुले व १३६ मुली असे एकूण २९८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

दि.१२/०२/२०२० रोजीच्या वर्तमानपत्रात "आदिवासी विद्यार्थ्यांचे साबण, तेल, केस कटींगचे पैसे ढापले. मुरबाडच्या वाल्हिवरे आश्रमशाळेच्या अध्यक्षांचा झोलझाल, भ्रष्टाचाराविरुध्द संस्थेच्या चिटणीस, कोषाध्यक्षाने केला भंडाफोड" या शिर्षकाखाली बातमी प्रसिद्ध झालेली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने शहापूर प्रकल्प कार्यालयातील आदिवासी विकास निरिक्षक व कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांनी अनुदानित आश्रमशाळा वाल्हिवरेला प्रत्यक्ष भेट देऊन कागदपत्रांची तपासणी केली असता विद्यार्थ्यांना आवश्यक वस्तूंचे वाटप केल्याचे आढळून आले. मात्र प्रमाणके, रोकड नोंदवहीमधील नोंदी व वस्तू साठा नोंदवही मधील नोंदी यामध्ये काही तफावती आढळून आल्या. त्याबाबत संस्थेने खुलासा सादर केला असून काही वस्तू संस्थेला सेवाभावी संस्थांमार्फत देणगी स्वरुपात मिळाल्याने सदर तफावती दिसून येत असल्याबाबत खुलासा सादर केला. यावरुन संस्थेने खोटी देयके बनवून निधीचा अपहार केला या म्हणण्यात तथ्य आढळून येत नाही. विद्यार्थ्यांनी अथवा त्यांच्या पालकांनी अत्यावश्यक जीवनावश्यक वस्तू मिळत नसल्याबाबत कोणतीही तक्रार अथवा पत्रव्यवहार या विभागाकडे केलेला नाही. पालक-विद्यार्थी तक्रार नोंदवहीचे अवलोकन केले असता त्यामध्ये देखिल जीवनावश्यक वस्तू मिळत नसल्याबाबत कोणतीही तक्रार नाही. विभागाच्या अधिकाऱ्यांनी सन २०१८-१९ व २०१९-२० या शैक्षणिक वर्षात वेळोवेळी दिलेल्या भेटीच्या वेळी देखिल याबाबत तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

वृत्तपत्रामधील बातमीमध्ये द्विसदस्यीय चौकशी समितीचा उल्लेख आहे. मात्र या संदर्भात शासनाने कोणतीही द्विसदस्यीय चौकशी समिती नेमलेली नाही. तसेच संस्थेकडे विचारणा केली असता, संस्थेने अशा प्रकारची द्विसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली नसल्याचे कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणी टोकावडे पोलीस स्टेशन यांच्याकडे विचारणा केली असता सहायक पोलीस निरीक्षक टोकावडे यांनी दिनांक ०७.०३.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे की, श्री.गोविंद घावट हे संस्थेचे सचिव असून त्यांनी श्री.पांडूरंग विठ्ठल पवार यांनी मारहाण करुन शिवीगाळ, दमदाटी केल्याबाबत तक्रार अर्ज दिलेला आहे. तसेच श्री.पांडूरंग विठ्ठल पवार हे सदर आश्रमशाळेत लिपिक पदावर कार्यरत असून त्यांनी श्री.गोविंद घावट, सचिव व श्री.संतोष घिगे, कोषाध्यक्ष यांच्याविरोधात दमदाटी केल्याबाबत तक्रार अर्ज दिलेला आहे. टोकावडे पोलीस स्टेशन येथे परस्पर विरोधी दोन तक्रार अर्ज दाखल असून त्याअनुषंगाने दोन्ही अर्जदार यांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता सी.आर.पी.सी. कलम १४९ प्रमाणे नोटीस देण्यात आली असून तक्रारदार श्री.गोविंद घावट यांनी कोणत्याही प्रकारचे पुरावे पोलीस स्टेशनला सादर केलेले नाही.

उपरोक्तप्रमाणे वस्तुस्थिती पाहता अनुदानित आश्रमशाळा, वाल्हिवरे या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यावश्यक व जीवनावश्यक वस्तूंच्या वापरापासून वंचित रहावे लागत असून सदर विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे, हे वस्तुस्थितीस धरून नाही.

********************************************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२० चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.चंद्रकांत पाटील, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री. लक्ष्मण जगताप, मोहन मते, विकास कुंभारे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र ११०

"राज्यात खाजगी सावकारांकडून शेतकरी आणि सर्वसामान्यांची लूट होऊ नये म्हणून राज्य सरकारने सन २०१४ मध्ये खाजगी सावकारी कायद्यात सुधारणा करणे, सावकारी कर्जाचे व्याज दर कमी करुन त्याच्या वसुलीबाबतही नियमावली जाहीर करणे, परंतु सर्व नियम धाब्यावर बसवून खाजगी सावकारांकडून कर्ज वसुली केली जात असल्याचे निदर्शनास येणे, गरजेपोटी ज्यादा व्याज दराने घेतलेल्या रकमेचा परतावा करुनही खाजगी सावकारांकडून होणा-या लुटमारीमुळे अनेकांना आपली राहती घरेही सोडावी लागणे, सावकारांची दहशत व भिती असल्याने अनेकदा पोलीस ठाण्यापर्यंत तक्रारी पोहचत नसणे, सावकार को-या कागदपत्रावर कर्जदारांच्या सह्या घेतात त्यामुळे त्यांच्या सहमतीने व्यवहार झाल्याचे दाखवले जाणे, त्यामुळे पुरावे सादर करण्यात कर्जदार अपयशी ठरत असल्याने सावकार मोकाट सुटणे, कर्ज वसुलीकरीता सावकार गुंडांच्या टोळ्या पोसत असणे, याचा फायदा घेत खाजगी सावकार सर्व सामान्यांसह गरजवंतांची लूट करीत असणे, शासनाने खाजगी सावकारी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया..."

---

### मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

सावकाराकडून होणा-या कर्जदार शेतक-यांच्या व सर्वसामान्यांच्या पिळवणूकीस प्रभावी रितीने प्रतिबंध करण्यासाठी समुचित व कठोर सामाजिक आणि कायदेशीर उपाय योजना करणे शासनास अत्यावश्यक झाले होते. त्याकरीता शासनाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ या कायद्याची अंमलबजावणी दिनांक १६.०१.२०१४ पासून सुरु केली आहे.

सावकारी कर्जाच्या व्याजदराबाबत व वसुली बाबत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३१ मध्ये तरतुद करण्यात आली असून सद्य:स्थितीत शेतक-यांकरिता सदरचे दर तारणी कर्ज ९ टक्के व विनातारणी कर्जासाठी १२ टक्के निश्चित करण्यात आले आहेत.

अनधिकृत सावकारी व्यवसाय करणा-या व्यक्तींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने तसेच सावकारी कायद्यांवर योग्य नियंत्रण ठेवण्याच्या उद्दिष्टाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ ची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत दिनांक १ मार्च २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था या तीन सदस्यांची समिती गठीत केली

आहे. सदर समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत व सदस्य सचिव जिल्हा उपनिबंधक आहेत. राज्यात सदर समितींच्या गठण झाल्यापासून आवश्यकतेनुसार एकूण १३१ सभा झालेल्या आहेत. भरारी पथकाने अवैध सावकारी रोखण्यासाठी १५२ अवैध सावकारांवर धाडी टाकलेल्या आहेत.

प्राप्त तक्रारींवर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम १६ खालील पडताळणीच्या दरम्यान व कलम १७ खालील तपासणीच्या दरम्यान निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे, सावकाराने कर्जदाराची स्थावर मालमत्ता ताब्यात ठेवल्याची जिल्हा निबंधकाची खात्री पटली तर जिल्हा निबंधकांकडून अधिनियमातील कलम १८(२) अन्वये त्या मालमत्तेचा कब्जा त्या कर्जदाराकडे परत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

राज्यात एकूण १०,५०८ परवानाधारक सावकार आहेत. जानेवारी २०१४ ते जानेवारी २०२० या कालावधीमध्ये अवैध सावकारीबाबत एकूण ७,१६२ तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ कलम १६ नुसार ७,०९८ तक्रार अर्जांची चौकशी प्रस्तावित केलेली आहे. त्यापैकी ६,१७१ तक्रार अर्जाची चौकशी पूर्ण झालेली आहे व ९२७ तक्रार अर्जाची चौकशी चालू आहे. चौकशीत तथ्य आढळलेल्या अर्जांची संख्या ९४४ आहे. तर ५२२७ प्रकरणात चौकशी अंती तथ्य आढळून आले नाही. सावकारास प्रतिभूती म्हणून दिलेल्या स्थावर मालमत्ता व्यवहाराची कलम १८(१) अन्वये चौकशी करण्यासाठी १९८० अर्ज प्राप्त झाले असून ९२५ प्रकरणात तथ्य आढळून आलेले नाही. ६९२ प्रकरणात चौकशी चालू असून त्यापैकी ३६० प्रकरणात ५१३.८६ हेक्टर जमीन संबंधित शेतकऱ्यांना परत करण्यात आली आहे.

विनापरवाना सावकारी करणाऱ्यांविरुध्द तसेच कर्ज वसूली करताना संबंधित कर्जदारास उपद्रव करणाऱ्यांविरुध्द कलम ३९ व ४५ मधील तरतुदीनुसार ३९२ प्रकरणांत फौजदारी गुन्हे दाखल केलेले आहेत.

*************************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२० चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**सर्वश्री. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. कालीदास कोळंबकर, सुनिल प्रभू, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, अभिमन्यु पवार, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ११२ : -**

"पनवेल (ता. पनवेल, जि.रायगड) येथील कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्ष व संचालकांनी हजारो कोटी रुपयाचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले असणे, उक्त बँकेच्या रायगड जिल्ह्यातील १७ शाखांतून जवळपास ५१३ कोटी ऐवढया रक्कमेचा अपहार झाल्याचे जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांनी त्यांचा दिनांक १३/१२/२०१९ चा चौकशी अहवाल दिनांक १९/१२/२०१९ रोजी सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयात सादर केलेल्या अहवालात स्पष्ट नमुद केले असणे, कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्षांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन बँकेचे खातेदार व गुंतवणूक दारांचे पैसे त्यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट व कर्नाळा स्पोर्टस् अकॅडमी या दोन संस्थांमध्ये अवैध सावकारी (Money laundering) पध्दतीने कोटयवधी रुपये नियमबाह्य वर्ग केले असणे, कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट व कर्नाळा स्पोर्टस् अकॅडमी या दोन संस्थांमध्ये कर्नाळा बँकेतील खातेदार व ठेवीदार यांनी गुंतवलेली कोटयवधी रुपयांची रक्कम वैयक्तीक स्वार्थापोटी अन्य ठिकाणी खर्च केली असणे, उक्त बँकेच्या अध्यक्ष व संचालकांनी केलेल्या कोटयवधी रुपयांच्या बँकेतील आर्थिक घोटाळयाबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे नवी मुंबई येथे जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग १, सहकारी संस्था, अलिबाग रायगड यांनी दिनांक १७/२/२०२० रोजी गुन्हा दाखल केला असणे, बराच कालावधी होवून सुध्दा बँकेच्या अध्यक्ष व संचालकावर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई झाली नसणे, वारंवार मागणी करुनसुध्दा बँकेच्या खातेदारांना आपली आयुष्याची पुंजी म्हणुन बँकेत ठेवलेली रक्कम परत देण्यासाठी बँकेच्या व्यवस्थापनाकडून असमर्थता दर्शविली जात असणे, बँकेतील खातेदार व गुंतवणूकदारांना बँकेकडून आपली आर्थिक फसवणूक होत असल्यामुळे खातेदार व ठेवीदारांमध्ये निर्माण झालेली चिडी व असंतोषाच्या भावनेबाबत शासनाने खातेदार व ठेवीदारांना त्यांच्या बँकेतल्या ठेवी तातडीने परत मिळण्यासाठी तसेच खातेदार व ठेवीदारांची फसवणूक करणाऱ्या बँकेच्या व्यवस्थापनाची सखोल व पारदर्शक चौकशी करण्यासाठी सदर बँकेतील आर्थिक घोटाळयाचे प्रकरण अंमलबजावणी संचालनालय (ईडी) कडे तातडीने वर्ग करण्याची नितांत गरज, त्यादृष्टीने शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रीया... "

---

### मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

कर्नाळा नागरी सहकारी बँक मर्या. पनवेल, जि. रायगड ही बँक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणीकृत बँक असून सदर बँकेची नोंदणी ०२.०३.१९९६ रोजी झालेली आहे. सद्यस्थितीत बँकेचे

एकूण ६,७३२ सभासद असून दिनांक ३१.०१.२०२० अखेर बँकेकडे ६७७९० ठेवीदारांच्या रु. ५०८.६८ कोटींच्या ठेवी व १,०५२ कर्जदारांकडून कर्ज रक्कम रु. ५६९.९३ कोटी येणे आहे.

भारतीय रिझर्व बँकेच्या दिनांक २२.०४.२०१९ रोजीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार सदर बँकेचे दिनांक ३१.०३.२०१८ अखेरच्या कर्जखात्यांचे विशेष लेखापरिक्षण करण्यात आले आहे. सदर विशेष लेखापरिक्षण अहवालानुसार एकूण ६३ कर्जप्रकरणांमध्ये रु.५१२.५४ कोटींचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून त्यापैकी १७ कर्जप्रकरणांमधील रक्कम रु. ९५.३१ कोटी कर्नाळा चॅरीटेबल ट्रस्ट व कर्नाळा ॲकेडमी यांच्या बँक खात्यामध्ये वर्ग झाल्याचे निदर्शनास येत आहे.

लेखापरिक्षण अहवालात नमूद गंभीर बाबींच्या अनुषंगाने आर्थिक गैरव्यवहारास जबाबदार असणारे बँकेचे अध्यक्ष, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी/कर्मचारी तसेच सर्व कर्जदार अशा एकूण ७६ व्यक्तींविरुध्द प्राधिकृत अधिकारी यांनी दिनांक १७.०२.२०२० रोजी सहायक पोलीस निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई यांचेकडे एफआयआर क्र.००७८ अन्वये गुन्हे दाखल केले असून पोलीस यंत्रणेमार्फत पुढील तपासाची कार्यवाही सुरु आहे.

विशेष लेखापरिक्षण अहवालात नमूद गैरव्यवहारामुळे बँकेस झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी संबंधितांवर निश्चित करण्यासाठी अधिनियमातील कलम ८८ अन्वये कार्यवाही करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांची दिनांक ०४.०२.२०२० रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली असून भारतीय रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार सहकार आयुक्तांनी दिनांक २०.०२.२०२० रोजीच्या आदेशान्वये बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन जिल्हा उपनिबंधक, रायगड यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे.

सदर बँकेच्या ठेवीदारांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने बँकेच्या ठेवीदारांना तात्काळ ठेवी देण्याबाबत सहकार आयुक्तांनी बँकेस आदेश दिले आहेत.

*********

मच १६४७-१a.

लक्षवेधी सूचना

श्री.कैलास गोरंट्याल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे:-

***लक्षवेधी सूचना***

" जालना येथील ग्रेन मार्केट, अर्जुन खोतकर बिजनेस सेंटर व जुने कॉटन मार्केट येथील गाळे व शोरूमच्या लिलाव व्यवहारात बाजार संचालकांकडून अनियमितता होणे, या बाजार समितीत सदर मिळकतीचा लिलाव झाल्यानंतर बोलीधारकांना प्रिमिअमची रक्कम भरलेली नसतानाही त्यांना गाळयांचा ताबा देणे, त्यामुळे समितीचे ७ कोटीचे नुकसान होणे गाळे लिलावाचे दर शासनाच्या दरापेक्षा ८२ रूपये कमी होणे, काही गाळयांचा लिलाव न करता वाटप करणे, येथील एक बांधकाम तांत्रिक सल्लागार सी.जी.असोशिएटचे भागीदार छाबडा यांना व त्यांच्या कुटुंबाचे नांवे २० पेक्षा जास्त मिळकती वाटप करणे, गाळे वाटप करतांना काही व्यापाऱ्यांना दोनपेक्षा जास्त व एका व्यापाऱ्यास ३४ गाळे करणे, तसेच समितीच्या २ एकर ३५ गुंठे जमिनीपेक्षा जास्त जमिन समितीच्या अभिलेखात न दाखविता परस्पर हडप करण्यासाठी दडवून ठेवणे, यामुळे समिती संचालकांच्या या भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याची येथे मागणी असतानाही शासनाकडून होत असलेला विलंब परिणामी येथील जनतेत पसरलेला असंतोष, त्यामुळे शासनाने येथील बाजार समितीच्या संचालकांची व त्यांच्या सहकाऱ्यांची सखोल चौकशी करून भ्रष्ट संचालक यांना बरखास्त करून येथे तात्काळ प्रशासक नेमण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया "

मा.मंत्री (सहकार व पणन) यांचे निवेदन

कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना चे संचालक मंडळ सभा दि.११.१०.२००८ चे ठराव क्र.१२ अन्वये जुना मोंढयातील वाणिज्य संकुल अंदाजपत्रकास तसेच दि.२७.०५.२००९ च्या संचालक मंडळ सभेतील ठराव क्र.२० प्रमाणे सुधारीत बांधकामाबाबत ठराव केला होता. सदर प्रस्तावास पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची अनुक्रमे दि.०१.०१.२००९ व दि.२४.०६.२००९ रोजी मान्यता दिली आहे. या मान्यतेनंतर बांधण्यात आलेल्या गाळे व शोरूमचा जाहिर लिलाव स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन सर्वात जास्त रक्कमेची बोली लावणाऱ्या व्यक्तींना गाळयांचे भाडेतत्वावर वाटप करण्यात आले आहे.

बाजार समितीने जवळपास सर्वच गाळे हे लिलावामध्ये शासकीय मुल्यांकन व ऑफसेट प्राईजपेक्षा जास्त बोली बोलणारे यांना दिलेले आहेत. परंतु, लिलाव झाल्यानंतर लिलावाच्या अटी व शर्ती नुसार मुदतीमध्ये काही गाळेधारकांनी प्रिमियम रक्कम व लिजभाडे भरणा केलेली दिसून येत नसल्यामुळे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४० ई अन्वये लिजप्रिमियम व लिजभाडे वसुलीसाठी निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार रक्कम रू.११,४५,५१,५००/- वसुली बाकी पैकी रक्कम ६,४०,५७,५००/- वसुली केलेली आहे. तसेच उर्वरित रक्कम रू.२,१८,६४,०००/- रक्कमेचे एकूण (१७) गाळे जप्त करण्यात आले आहे व त्यांची अनामत (डिपॉझिट) रक्कम रू.२७,५०,०००/- जप्त केलेली आहे. सदरील (१७) जप्त केलेले गाळयाचा फेरलिलाव सत्वर करण्यात येत आहे.

बाजार समितीने सन २००६-०७ मध्ये जुने कॉटन मार्केट विंग क्र.६ पहिला मजला (व्यापारी गाळे वरील टेरेस) चा रेडीरेकनर दर रु.१५०८/- रु.प्रतिचौरस मीटर असतांना ते रु.१४२६/- प्रति चौरस

[कृ.मा.प.

मिटर लिजप्रिमियम लावलेला असल्यामुळे या प्रकरणी रु.८२/- प्रतिचौरस मीटर इतका फरक आहे. त्यामुळे रक्कम रु.३४०५५/- कमी भरणा केल्याचे बाजार समितीच्या फेर लेखापरिक्षण अहवालामध्ये नमुद केलेले आहे. त्यामुळे सदरील रक्कम दि.०१.०२.२०२० रोजी श्री.प्रमोद तोतला यांनी भरणा केलेली आहे. अशी वस्तुस्थिती फक्त एकाच गाळयाच्या बाबतीत झालेली आहे व सदरील रक्कम वसुली झालेली आहे.

बाजार समितीचे तांत्रिक सल्लागार सी.जी.असोसिएटचे भागीदार श्री.अजित छाबडा यांच्या कुटुंबाचे नांवे २० मिळकती आहेत. परंतु या मिळकती त्यांनी जाहिर लिलावा मध्ये भाग घेवुन जास्तीत जास्त बोली लावल्यामुळे त्यांना लिलावाव्दारे मिळालेल्या आहेत. तसेच एका व्यापा-यास ३४ गाळे वाटप केलेले नाही. लिलाव प्रक्रियेमध्ये एका बोलीधारकांनी किती गाळे करिता बोली बोलुन गाळे घ्यावे या बाबतीत परिपत्रक व सुचना नसल्यामुळे समितीच्या जाहिर लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेवुन बोलीधारकांनी जास्तीत जास्त बोली बोलुन वेगवेगळ्या ठिकाणी गाळे घेतलेले आहेत. जालना कृषि उत्पन्न बाजार समितीचे बांधकाम विषयक सल्लागार म्हणुन नियुक्त असतांना जालना बाजार समितीमध्ये कोणती मालमत्ता घ्यावी अथवा घेवु नये या बाबत कोणतीही नियमावली असल्याचे अथवा त्यांना नियुक्त केलेल्या अटी व शर्ती मध्ये कोणतीही अट नमुद नाही. बाजार समितीने त्यांना नियुक्ती केलेच्या ठरावात देखील अशी अट नाही असे बाजार समितीने सादर केलेल्या माहिती वरुन दिसुन येते.

कृषि उत्पन्न बाजार समिती जालना येथील गाळे वाटपात अनियमितता झाल्याची तक्रार श्रीमती प्रिती मेनन शर्मा, आमआदमी पार्टी यांनी .मा. लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे केली होती. सदरची तक्रार मा.लोक आयुक्त यांनी निकाली काढलेली आहे.

बाजार समितीने फेरफार नोंद क्र.५७, दि.०२.०७.१९६२ रोजी एकूण ०९ एकर ३७ गुंठे इतकी जमीन घेतल्याची नोंद आहे. मात्र, त्यानंतर दि.३१.०३.२०१७ रोजीचे बाजार समितीचे मालमत्ता पत्रकावर ७ एकर ३ गुंठे अशी नोंद आहे. सीटी सर्व्हे नं.१४७१ व ३८० मध्ये अनुक्रमे २६०३३.७० चौमी व २६३३.७० चौमी असे एकुण २८६६७.४० चौमिटर आहे. जालना कृषि उत्पन्न बाजार समितीने बांधकामासाठी मंजुर केलेल्या प्लानवर देखील २८६६७.४० चौरसमीटर एकुण क्षेत्रफळाची नोंद आहे. एकुण ९ एकर ३७ गुंठे जमीनीपैकी २ एकर ३५ गुंठे जमीन विक्री अथवा हस्तांतर केलेली नसतांना देखील बाजार समितीचे नावाने आज ७ एकर २ गुंठे जमीन मालमत्ता पत्रकानुसार शिल्लक व ताब्यात आहे तर २ एकर ३५ गुंठे जमीन जालना कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मालमत्ता पत्रकात नोंद नाही व ताब्यातही नाही. सदर फरकाबाबत बाजार समितीने अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, जालना यांना दि.३१.०७.२०१८ रोजी, समितीचे जुने कॉटन मार्केट येथील स.नं.२२४ सीटीएस क्र.३८० व १७४१ वरील क्षेत्र व नगर भुमापन क्रमांकातील मालमत्ता पत्रकातील क्षेत्र जुळत नसुन जमीन मोजणी करुन या बाबतचे जमीनीची नोंद घेवुन ७/१२ आणि मालमत्ता पत्रका बाबत अहवाल देणे बाबत कळविले आहे. तसेच बाजार समितीने अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, जालना यांना दि.३१.०७.२०१८ रोजी, समितीचे जुना मोंढा येथील सर्व्हे नं.२२६ सीटीएस क्र.२८७, २८८, २८९, २९० वरील क्षेत्र व नगर भुमापन क्रमांकातील मालमत्ता पत्रकातील क्षेत्र जुळत नसुन जमीन मोजणी करुन या बाबतचे जमीनीची नोंद घेवुन ७/१२ आणि मालमत्ता पत्रका बाबत अहवाल देणे बाबत कळविले असुन या बाबत सातत्याने पाठपुरावा चालु आहे.

********

# महाराष्ट्र विधानसभा
# सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना

सर्वश्री. दिपक चव्हाण, अशोक पवार, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षिरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री विकास ठाकरे, बळवंत वानखेडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री राजु पारवे, सुभाष धोटे, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, अबू आजमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना वरील निवेदन महिला व बालविकास मंत्री सभागृहाच्या पटलावर ठेवतील:-

"महिला व बाल कल्याण विभागा अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई अंतर्गत आदर्श अंगणवाडी किट वाटपाचे निविदेमध्ये चुकीची तथा खोटी दस्तावेज सादर करुनही मे.टेक्नोक्राफ्ट असोसिएटस् यांना रु.४९.९८ कोटींचा कंत्राट दिल्याचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये निदर्शनास येणे, सदर निविदेतील अटी व शर्तीमधील तांत्रिक मुद्दा क्र.३.१ नुसार निविदाधारकांची मागील ३ वर्षातील आर्थिक उलाढाल रु.४० कोटींपेक्षा जास्त असल्याचे अटीमध्ये मे.टेक्नोक्राफ्ट असोसिएटस् यांनी सन २०१६-२०१७, २०१७-१८, २०१८-१९ मधील C.A. प्रमाणित रु.३९,३८,३३,०११/- इतक्या रक्कमेचे प्रमाणात सादर करण्यात येणे, तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील C.A. प्रमाणित रु.५७.८२ कोटींचा ताळेबंद सादर करण्यात येणे, सदर ताळेबंदाची युनियन डाक्यूमेंट आयडेंटीफिकेशन यांनी तपासणी केली असता सदर ताळेबंद रु.३१.६८ कोटींचा असणे, निविदाधारकांने सादर केलेल्या दस्तावेजांची निविदा मंजुरीचे प्रक्रियेमध्ये पडताळणी समितीने दस्तावेजांची पडताळणी बरोबर केली नसणे, त्यामध्ये सदर कंत्राटदाराला निविदा मंजुरी करीता पडताळणी समितीने हेतुपुरस्पर सहाकार्य केल्याचे निदर्शनास येणे, यामुळे शासनाप्रती नागरिकांमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## निवेदन

### (ॲड. यशोमती ठाकूर, मंत्री, महिला व बाल विकास)

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राज्यातील अंगणवाडी केंद्राचे टप्प्याटप्प्याने आदर्श अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यासाठी स्मार्ट अंगणवाडी किट उपलब्ध करुन देण्यास शासनाच्या मान्यतेने ई-निविदा प्रकाशित करण्यात आली होती. सदर ई-निविदे अंतर्गत प्राप्त सर्व सहभागी निविदाधारकांच्या कागदपत्रांची समितीमार्फत पडताळणी करुन तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाधारकांचे व्यापारी लिफाके उघडण्यात आलेले होते. या प्रक्रियेअंतर्गत मे. टेक्नोक्राफट असोसिएट्स, मुंबई यांचे दर सर्वात कमी आल्याने ते L1 निविदाधारक म्हणून घोषित झालेले होते. सदर पुरवठाधारकास दि. १३/९/२०१९ रोजी ३०३२ अंगणवाडी केंद्राना स्मार्ट अंगणवाडी किट पुरवठा करणेसाठी रु. ४९.९८ कोटी रक्कमेचा कार्यादेश निर्गमित करण्यात आलेला होता.

[कृ.मा.प.

या ई-निविदेच्या अट क्र. ३.१ नुसार प्रत्येक निविदाधारकास मागील ३ आर्थीक वर्षातील सरासरी उलाढाल ४० कोटी असणे आवश्यक होते, या ई-निविदेअंतर्गत सर्व निविदाधारकांचे दस्ताऐवजांची तपासणी माहे सप्टेंबर २०१९ मध्ये करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार कंपन्या व व्यापारी संस्था यांना अंतीम अंकेक्षणासाठी दि. ३१ ऑक्टोंबर, २०१९ पर्यंत कालावधी देण्यात आलेला होता. त्यानुसार सदर कालावधीत ज्या कंपन्यांचे लेखा परिक्षण झालेले नसेल अशा कंपन्या सनदी लेखापाल (CA) यांच्या स्वाक्षरीने प्रोव्हीजनल टर्न ओव्हर प्रमाणपत्र सादर करीत असतात.

या अनुषंगाने सदर L १ निविदाधारक यांनी सनदी लेखापाल यांचेस्वाक्षरीने प्रोव्हीजनल टर्न ओव्हर प्रमाणपत्र सादर केलेले होते. सदर प्रमाणपत्रात नमुद आर्थिक उलाढाल विचारात घेऊन कागदपत्र पडताळणी समितीने निविदाधारकास तांत्रिकदृष्टया पात्र केलेले होते. सदर निविदाधारकामार्फत निविदे अंतर्गत सादर करण्यात आलेले दस्ताऐवज चुकीची तथा खोटी नसून CA च्या स्वाक्षरीने सादर केलेले होते. त्याच CA नी अंतिम लेखापरिक्षण झाल्यानंतरचे आर्थिक उलाढाल (Turnover) व ताळेबंद प्रमाणित केलेले असून सदर बाबतची माहिती सादर करणेबाबत आयुक्त कार्यालयाने मे. टेक्नोक्राफट असोसिएटस, मुंबई या कंपनीस कळविलेले होते.

सदर कंपनीमार्फत यापूर्वी सादर करण्यात आलेले प्रोव्हिजनल टर्नओव्हर प्रमाणपत्र नुसारची २०१८-१९ या आर्थीक वर्षामधील आर्थीक उलाढाल अंतीम लेखा परिक्षणाअंती काही कंत्राटे रद्द झाल्याने कमी झालेले असल्याचे आयुक्तालयास कळविलेले होते. याअनुषंगाने सदर बाबतची नोंद घेऊन मे. टेक्नोक्राफट असोसिएटस, मुंबई हे निविदाधारक तांत्रिकदृष्टया अपात्र ठरत असल्याने सदरची निविदा रद्द करुन त्यांचेवर योग्य ती कारवाई करणेबाबत आयुक्तालयामार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. यानुसार शासनाने दि. २१ जानेवारी २०२० च्या पत्रान्वये तात्काळ सदरची निविदा रद्द करुन संबधित पुरवठाधारकास कारणे दाखवा नोटीस बजावून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, तसेच सदर कामासाठी नव्याने निविदा प्रकाशित करावी, असे निर्देश प्राप्त झालेले होते.

त्यानुसार या कार्यालयामार्फत सदरची निविदा रद्द केलेली असून मे.टेक्नोक्राफ्ट असोसिएटस, मुंबई या पुरवठाधारकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. संबधित पुरवठाधारकामार्फत नोटीसीचा खुलासा प्राप्त झालेला असून ई-निविदेच्या दस्ताऐवजामधील अटी व शर्तीनुसार तसेच शासनाच्या सुधारित खरेदी धोरणानुसार संबधितावर कारवाई करण्यात येत आहे.

सदर निविदेअंतर्गत सर्व सहभागी निविदाधारकांचे ऑनलाईन पध्दतीने प्राप्त दस्ताऐवजांची छाननी कागदपत्र पडताळणी समितीमार्फत करण्यात आलेली असून सर्व सहभागी निविदाधारक निहाय स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना सादर केलेला होता. त्यानंतर आयुक्त कार्यालयामार्फत खरेदी धोरणात नमुद प्रयोगशाळेकडून साहित्याच्या नमुन्यांची तपासणी करुन त्यानंतर व्यापारी लिफाफे उघडण्यात आलेले आहेत. व्यापारी लिफाफ्यांची तुलना करण्यात येऊन L1 निविदाधारक घोषित करण्यात येतो. त्यामुळे कागदपत्र पडताळणी समितीस कोणता निविदाधारक L1 येणार आहे याबाबतची कल्पना नसते. यावरुन एखाद्या निविदाधारकास निविदा मंजुरी करीता पडताळणी समितीने हेतू पुरस्कर सहकार्य केले असे म्हणणे योग्य होणार नाही.

* * * * *

------

एच-१६६८-१अ.

# महाराष्ट्र विधानसभा
# सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन
## लक्षवेधी सूचना

सर्वश्री. संतोष बांगर, सुरेश वरपुडकर, प्रकाश फातर्पेकर, संजय पोतनीस, चंद्रकांत पाटील, महेंद्र दळवी, किशोर पाटील, सुनिल राऊत, सुनिल प्रभु, विकास ठाकरे, विधानसभा सदस्य यांच्या लक्षवेधी सूचना वरील निवेदन महिला व बालविकास मंत्री सभागृहाच्या पटलावर ठेवतील:-

"महाराष्ट्र राज्यात शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकीय रुग्णालयात गरोदरपणाची नाव नोंदणी केलेल्या व त्या ठिकाणी प्रसूत होणाऱ्या महिलांना त्यांचे पहिल्या प्रसूतीच्या वेळी त्यांचे नवजात बालकांसाठी शासनाने रुपये २००० एवढया रकमेची बेबी केअर किट उपलब्ध करुन देण्यास दिनांक ११/१२/२०१८ रोजी च्या मंत्रिमंडळात मान्यता मिळणे, त्यानुसार दिनांक १३/०८/२०१९ रोजी बेबी केअर कीट पुरविण्याबाबत निविदा प्रकाशित होणे, निविदेनुसार पुरवठादारास नियम व अटी बंधनकारक असणे, इंडो अलाइट प्रायव्हेट लिमिटेड या कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश प्रदान करणे, स्वीकृत निवेदा धारकास कार्यारंभ आदेश पासून ९० दिवसाचे आत विभागास पुरवठा करणे बंधनकारक असणे, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय महाराष्ट्र राज्य यांनी विहित वेळेत पुरवठा न झाल्याची बाब लेखी कळविणे, सदरहू निविदेमध्ये बेबी केअर किट चा पुरवठा फक्त एका वर्षाच्या कालावधीकरिता नमूद असणे, कार्यारंभ आदेश प्रदान करताना पुरवठा धारकांवर मेहरबानी करत त्याच निधी उपलब्धतेनुसार सदर पुरवठा निविदेतील नियमांना बगल देत तीन वर्षाकरता देण्यात येणे, बेबी केअर किट निविदेतील प्रस्तावित किमतीपेक्षा कमी म्हणजे बाजार किंमत रुपये तीनशे मात्र असणे, जनमानसात निविदा कमिटी संबंधित पुरवठा धारकांवर मेहरबान असल्याबाबत शंका उपस्थित होऊन शासनाचे करोडो रुपयाचा झालेला अपहार, याबाबत शासनाने संबधित पुरवठा धारकांवर करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## निवेदन
### (अॅड. यशोमती ठाकूर, मंत्री, महिला व बाल विकास)

महाराष्ट्र राज्यात शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/ शासकीय रुग्णालयात गरोदरपणी नाव नोंदणी केलेल्या व त्याठिकाणी प्रसुती होणाऱ्या नवजात बालकांना पहिल्या प्रसुतीच्या वेळी मुलगा किंवा मुलगी जन्मल्यानंतर त्यांना मोफत शासनातर्फे रुपये २०००/- इतक्या रक्कमेपर्यंत "बेबी केअर कीट" बॅग उपलब्ध करुन देण्यास शासन निर्णय दिनांक २९ डिसेंबर, २०१८ अन्वये मान्यता दिलेली होती. सदर बेबी केअर किटमध्ये (१) लहान मुलांचे कपडे (२) प्लास्टीक लंगोट (३) लहान मुलांची झोपण्याची लहान गादी (४) लहान मुलांचे टॉवेल (५) ताप मापन यंत्र इलेक्टॉनिक्स थर्मामिटर (६) लहान मुलांना अंगाला लावावयाचे तेल- २५० मि.ली. (७) मच्छरदाणी (८) लहान मुलांसाठी गरम ब्लँकेट (९) लहान चटई प्लास्टीक (१०) लहान मुलांचा शॅम्पो- ६० मि.ली. (११) लहान मुलांची खेळणी- खुळखुळा (१२) लहान मुलांची नखे काढण्यासाठी नेलकटर (१३) लहान मुलांसाठी हातमोजे व पायमोजे (१४) लहान मुलांच्या आईसाठी हात धुण्याचे लिक्विड (१५) लहान मुलाला बांधुन ठेवण्यासाठी कापड/ आईसाठी लोकरीचे कापड (१६) लहान मुलांसाठी बॉडी वॉश लिक्वीड (१७) सर्व साहित्य ठेवण्यासाठी लहान बॅग इ. साहित्याचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर "बेबी केअर किट" मध्ये विविध प्रकारच्या १७ साहित्याचा समावेश असल्यामुळे त्यांचे Specifications निर्धारित करणे आवश्यक होते. यासाठी दिनांक १/२/२०१९ रोजी बैठकीचे आयोजन आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे स्तरावर करण्यात येऊन Specifications निर्धारित करण्यात आलेले आहेत.

[कृ.मा.प.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये "बेबी केअर किट" उपलब्ध करुन देणेसाठी शासनाने ई-निविदा प्रकाशित करण्यास दिनांक ९ ऑगस्ट २०१९ च्या पत्रान्वये मान्यता दिलेली होती. त्यानुसार ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा प्रकाशित करुन सदर निविदा प्रक्रियेनुसार L १ निविदाधारक मे. इंडो अलाईड प्रोटीन फुड्स प्रा. लि., मुंबई यांचेकडून सन २०१९-२० या आर्थिक वर्षात टप्प्याटप्प्याने एकुण ४००८७५ एवढे बेबी केअर किट प्रति संच रुपये १९९५.६३ या दराने उपलब्ध करुन देण्यास शासनाने दिनांक १३/९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार या कार्यालयामार्फत सन २०१९-२० या आर्थिक वर्षात ४००८७५ बेबी केअर किट पैकी प्रथम टप्प्यात १९३६२४ बेबी केअर किटचा पुरवठा प्रकल्पस्तरावर करणेसाठीचे कार्यादेश मे. इंडो अलाईड प्रोटीन फुड्स प्रा. लि., मुंबई यांना देणेत आलेले आहेत.

पुरवठाधारकास पुरवठा आदेशानुसार ९० दिवसात पुरवठा करणेबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि, पुरवठाधारकाने सदर कालावधीत पुरवठा करणेसाठी काही तांत्रिक अडचणी उद्भवत असल्याने मुदतवाढीस मान्यता मागितली होती. त्यानुसार बेबी केअर किट निविदेतील अट क्र. ३४ अन्वये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार दिनांक १५ मार्च, २०२० पर्यंत पुरवठयास मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत मे. इंडो अलाईड प्रोटीन फुड्स प्रा. लि., मुंबई यांचेमार्फत प्रथम टप्प्यातील १९३६२४ बेबी केअर किट पैकी १२२२५३ बेबी केअर किटचा पुरवठा प्रकल्प स्तरावर करण्यात आलेला असून त्याची देयके अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित पुरवठा अंतीम टप्प्यात आहे.

बेबी केअर किट खरेदीसाठीच्या निविदा दस्ताऐवजा अट क्र. ४३ अंतर्गत सदरची निविदा तीन वर्षासाठी असून त्या कालावधीत L १ निविदाधारकास पुरवठा करणे बंधनकारक असे स्पष्टपणे नमुद करण्यात आलेले आहे. मुळातच सदरची निविदा ही ३ वर्षाकरिताच प्रसिध्द करण्यात आलेली असून त्यानुसार पुढील येणाऱ्या ३ आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध होणाऱ्या आर्थीक तरतुदीनुसार स्वतंत्रपणे शासनाच्या मान्यतेने कार्यादेश निर्गमित करण्यात येतील. सदरची बाब पुरवठाधारकास निर्देशित करण्यासाठी पुरवठा आदेशात नमुद करण्यात आलेली आहे.

बेबी केअर किटची अंदाजित रक्कम सन २०१८ या आर्थीक वर्षात निर्धारित करण्यात आलेली असून अंदाजित किंमत रुपये २०००/- ठरविण्यात आली होती. ई-निविदा प्रक्रियेअंती L१ निविदाधारकाचा दर रुपये १९९५/- प्रति किट (१७ साहित्य) आलेला आहे. या किट मधील सर्व १७ प्रकारच्या वस्तुंची बाजारभावात पडताळणी केली तरी यापेक्षा कमी किंमतीस बेबी केअर किट बॅग सह आजही उपलब्ध होऊ शकणार नाही. तसेच निविदा कमिटी संबधित पुरवठाधारकावर मेहरभान होण्याचा यामध्ये कुठेही प्रश्न उपस्थित होत नसून निविदा कमिटीचे कामकाज L१ निविदाधारक घोषित होण्यापूर्वीच पुर्ण झालेले असते.

सदरची निविदा प्रक्रिया ही शासनाच्या नवीन खरेदी धोरणानुसार पुर्णत: पारदर्शक पध्दतीने राबविण्यात आलेली असून यामध्ये कोणत्याही प्रकारची अफरातफर / अपहार झालेला नाही. तसेच कार्यारंभ आदेशानुसार व संबधित पुरवठाधारकास देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार त्यांचेमार्फत बेबी केअर किट पुरवठयाचे कामकाज सुरळीपणे सुरु आहे. यापुढे मुदतवाढ दिल्यानंतर देखील पुरवठा विलंबाने केल्यास संबधित पुरवठाधारकावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

* * * * *

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

मा.श्री.नरेंद्र भोंडेकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५
अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना खालीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील सन २००२ पासून आजपर्यंत शासनमान्य खाजगी संस्था मार्फत
चालविण्यात येणाऱ्या "अ" श्रेणीतील १२३ विनाअनुदानित तत्वावरील अपंगाच्या विशेष निवासी,
अनिवासी शाळा व कर्मशाळांना शासन निर्णय क्र.इडीडी-२०१२/प्र.क्र.६७/अ.क.१, दि.०८.०४.२०१५
नुसार सदर शाळांना १०० टक्के अनुदान तत्वावर मान्यता देणे, त्यानंतर सलग ३ वर्ष पदनिर्मितीची
मान्यता देण्यासाठी विलंब करणे तसेच शासन निर्णय क्र.इडीडी-२०१८/प्र.क्र.१३८/अ.क.१,
दि.०६.११.२०१८ नुसार पदनिर्मितीस व ५० टक्के अनुदान तत्वावर शासनाने पुनश्च निर्णय घेणे, त्यात
कालावधी ०६.११.२०१८ पासूनच वेतनाचा लाभ देण्याचा निर्णय होणे, दि.०८.०४.२०१५ ते
दि.०६.११.२०१८ पर्यंत कोणतीही थकबाकी अनुज्ञेय राहणार नसणे, या प्रमाणे शासनाने निर्णय
घेतल्याने हा निर्णय मतिमंद (दिव्यांग) विद्यार्थी सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक असणे, या
प्रकरणी लोकप्रतिनिधीद्वारे मा.मुख्यमंत्री, व सामाजिक न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
यांना दि.०७.०१.२०२० रोजी निवेदनाद्वारे मागणी करणे, परंतू मतिमंदांच्या अ श्रेणीतील १२३
विनाअनुदानित तत्वावरील अपंगाच्या विशेष निवासी, अनिवासी शाळा व कर्मशाळांच्या कर्मचाऱ्यांचे
पदनिर्मितीचे प्रस्ताव गेल्या काही महिन्यापासून मा.आयुक्त, अपंग आयुक्तालय, पुणे यांचे
कार्यालयात प्रलंबित असणे, शाळांच्या मान्यतेचे प्रस्ताव शासन स्तरावर न येणे, पुढील कार्यवाही
रेंगाळलेली असणे, या गंभीर बाबीमुळे, शासनाच्या दिरंगाईमुळे, कर्मचाऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण
झालेली असंतोषाची भावना, परिणामी याकडे तातडीने लक्ष वेधून सदर बाब लक्षात घेता तात्काळ
निर्णय होण्यासाठी तसेच दिव्यांग (मतिमंद) व सेवेतील कर्मचाऱ्यांना लाभ मिळावा यासाठी
करावयाच्या कार्यवाहीची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिकिया."

### सामाजिक न्याय मंत्री यांचे निवेदन

राज्यात दिव्यांगांच्या स्वयंसेवी संस्थांमार्फत ७२९ विशेष शाळा / कार्यशाळा अनुदान
तत्वावर चालविल्या जात आहेत. त्यापैकी विशेष शाळा ६४३ व कर्मशाळा ८६ अशा आहेत. शासन
निर्णय दि.०८.०४.२०१५ स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या "अ" श्रेणीतील १२३
विनाअनुदान तत्वावरील शाळा/कार्यशाळांना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. तसेच
शासन निर्णय दि.०६.११.२०१८ अन्वये स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या १२३ पैकी १२१
अनुदान तत्वावरील दिव्यांगांच्या विशेष निवासी/अनिवासी शाळा/कर्मशाळांना पदमान्यता देण्यात
आली आहे.

शासन निर्णय दि.०८.०४.२०१५ अन्वये स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या
विनाअनुदानित तत्वावरील शाळा/कर्मशाळांना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आलेल्या १२३ पैकी
१२१ शाळा/कर्मशाळा असून, १२१ शाळा/कर्मशाळांपैकी १४ शाळा/कर्मशाळांचा वाढीव विद्यार्थी
संख्येचा प्रस्ताव आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्याकडून छाननी/तपासणी होऊन शासनास
अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. सदरहू शाळा/कर्मशाळांचा प्रस्ताव आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे

यांच्याकडून छाननी/तपासणी होऊन शासनास प्राप्त झाल्यावर सदरहू शाळांच्या पदमान्यतेकरीता मा.उच्चस्तर सचिव समितीकडे सादर करण्यात येईल. तसेच शासन निर्णय दि.६.११.२०१८ अन्वये १२१ शाळा/कर्मशाळांना पदमंजूरी देण्यात आलेली आहे. त्या शाळांचे प्रस्ताव आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्या स्तरावर तपासणी सुरु असून त्याबाबतचा परिपूर्ण अहवाल शासनास प्राप्त होताच सदरहू शाळा/कर्मशाळांचे समाजसेवार्थ प्रणालीचे काम पूर्ण करण्यात येईल. त्याचप्रमाणे १२१ शाळा/कर्मशाळांपैकी ज्या शाळांना ५० टक्के अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आलेली आहे त्या शाळा/कर्मशाळांना १०० टक्के अनुदानावर आणण्याकरीता आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्या स्तरावरुन त्या शाळा/कर्मशाळांची नियमानूसार तपासणी करुन शासनास अहवाल प्राप्त झाल्यावर त्या शाळा/कर्मशाळांना १०० टक्के अनुदान तत्वावर मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

तद्‌नंतर स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या विशेष शाळा /कर्मशाळांना अनुदान तत्वावर मान्यता देवून कर्मचारी वेतनावर १०० टक्के, वेतनेतर खर्च वेतन खर्चाच्या ८ टक्के मर्यादेत,इमारत भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या मूल्यांकनाच्या ७५ टक्के व परिपोषण अनुदान प्रति लाभार्थी दरमहा १५००/-,अंध,कर्णबधिर व अस्थिव्यंगासाठी व रुपये १६५०/- मतिमंदासाठी देण्यात येत आहे. शासन निर्णय दिनांक ०६.११.२०१८ अन्वये १२३ शाळा/कार्यशाळांना शासनाने पदमंजूरी दिलेली आहे त्या शाळा / कार्यशाळेतील कार्यरत वर्ग-०३ च्या कर्मचा-यांना संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांचेकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येते व तसेच वर्ग-०४ च्या कर्मचा-यांना संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येते.ज्या कर्मचा-यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे अशा सर्व कर्मचा-यांना शासन निर्णय दिनांक ०६.११.२०१८ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनूसार वेतन अदा करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडून करण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय दि.०६.११.२०१८ मधील काही शाळा/कर्मशाळांच्या पदनिर्मितीचा प्रस्तावावर आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांचे स्तरावर उचित कार्यवाही सुरु आहे.

******